रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड बुधवार । दि. ९ सप्टेंबर २०२६ । अंक ९५ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in




## बोगस डॉक्टरचा पर्दाफाश

**पनवेल :** कसळखंड गावात वैद्यकीय पदवी नसतानाही सुमारे दीड महिन्यापासून दवाखाना चालवून रुग्णांवर उपचार करणाऱ्या नुरूल हुडा इमामुल हक (२७) याच्यावर पोलिसांनी कारवाई केली. आरोग्य विभागाच्या पथकाने दवाखान्याची तपासणी केली असता विविध औषधांचा साठा आढळून आला. ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर आरोग्य विभाग व पोलिसांनी ही कारवाई केली. नुरूल याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो रुग्णांच्या घरी जाऊनही उपचार करीत असल्याची माहिती असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# कोकणकर टोलमुक्त

## मुंबई-गोवा, मुंबई-बंगळुरू महामार्गासह अटल सेतूवर सवलत

। मुंबई । प्रतिनिधी ।

गणपती बाप्पाच्या आगमनाची लगबग सुरू असतानाच कोकणच्या वाटेवर निघणाऱ्या लाखो गणेशभक्तांसाठी राज्य सरकारने मोठी खुशखबर दिली आहे. गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या खासगी वाहनांसह एसटी बसेसनाही टोलमाफी देण्यात आली असून, मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-बंगळुरू महामार्ग आणि अटल सेतूवर ११ ते २७ सप्टेंबरदरम्यान ही सवलत लागू राहणार आहे. त्यामुळे बाप्पाच्या भेटीसाठी गावाकडे जाणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुखकर होणार असून, प्रवासखर्चातही पान २ वर




### या मार्गांवर टोलमाफी

११ ते २७ सप्टेंबर या कालावधीत गणेशभक्तांना पुढील प्रमुख मार्गांवर टोलमाफी मिळणार आहे.

- मुंबई-गोवा महामार्ग (राष्ट्रीय महामार्ग ६६)
- मुंबई-बंगळुरू महामार्ग (राष्ट्रीय महामार्ग ४८)
- अटल सेतू
- सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील संबंधित मार्ग

### एसटी बसेसना मिळणार सवलत

कोकणात जाणाऱ्या एसटी बसेसनाही पथकरातून सवलत दिली आहे. एसटी बसेससाठी पोलीस आणि आरटीओच्या समन्वयातून विशेष पासची व्यवस्था केली जाणार आहे.

### 'कोकण दर्शन' पास बंधनकारक

टोलमाफीचा लाभ घेण्यासाठी वाहनावर 'गणेशोत्सव २०२६ कोकण दर्शन' हा विशेष पास किंवा चिकटपट्टी लावणे आवश्यक आहे. त्यावर वाहनाचा नोंदणी क्रमांक आणि चालकाचे नाव नमूद केले जाईल. हा पास गणेशभक्तांना जवळचे पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौकी आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) विनामूल्य उपलब्ध करून दिला जाणार आहे. विशेष म्हणजे, परतीच्या प्रवासासाठीही हाच पास ग्राह्य धरला जाणार आहे.

## गणेशोत्सवात महामार्गावर अवजड वाहनांना बंदी

। रायगड । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुरळीत व्हावा आणि मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडी टाळता यावी, यासाठी राज्य शासनाने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर १६ टन किंवा त्याहून अधिक वजनक्षमतेच्या अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घातली आहे. परिवहन विभागाने याबाबत आदेश जारी केला आहे.

गणेशोत्सव काळात कोकणात एसटीच्या जादा बसेससह खासगी वाहनांची मोठी वर्दळ वाढते. त्यात अवजड वाहने, ट्रेलर आणि वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते. त्यामुळे मोटार वाहन अधिनियमातील तरतुदींनुसार हे निर्बंध पान २ वर

### या दिवशी वाहने राहणार बंद

- मूर्ती आगमन व पूर्वतयारीचा प्रवास : ११ सप्टेंबर २०२६ मध्यरात्री ००:०१ वाजेपासून ते १५ सप्टेंबर २०२६ रात्री २३:०० वाजेपर्यंत.
- पाच दिवसांचे गणपती विसर्जन/परतीचा प्रवास : १८ सप्टेंबर २०२६ सकाळी ०८:०० ते रात्री २३:०० वाजेपर्यंत.
- गौरी-गणपती विसर्जन (सात दिवस) / परतीचा प्रवास : १९ सप्टेंबर २०२६ सकाळी ०८:०० ते रात्री २३:०० वाजेपर्यंत आणि २० सप्टेंबर २०२६ रात्री २३:०० वाजेपर्यंत.
- अनंत चतुर्दशी (विसर्जन व परतीचा मोठा प्रवास) : २५ सप्टेंबर २०२६ सकाळी ०८:०० वाजेपासून ते २६ सप्टेंबर २०२६ रात्री २०:०० वाजेपर्यंत.
- स्थानिक परिस्थितीनुसार गरज भासल्यास निर्बंध शिथिल करण्याचे अधिकार नवी मुंबईचे पोलीस आयुक्त आणि संबंधित जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांना देण्यात आले आहेत.

## वेधक

### दहा हजारांची मागणी महागात

**रायगड :** सामाजिक संस्थेच्या नोंदणीसाठी कागदपत्रे तयार करून देण्यासाठी दहा हजार रुपयांची लाच मागण्यात आली होती. यामध्ये धर्मादाय आयुक्त कार्यालयातील कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडला असून, त्याच्याविरोधात लाच घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे याबाबत तक्रार दाखल झाली होती. याप्रकरणी मंगळवारी (दि.८) दुपारी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सासरच्या जाचामुळे विवाहितेची आत्महत्या

**रायगड :** सासरच्या जाचाला कंटाळून विवाहित महिलेने आत्महत्या केली. याप्रकरणी पतीसह तिघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उर्मिला गुप्ता असे या मयत महिलेचे नाव आहे. या महिलेचे २०२५ मध्ये प्रध्युमन यांच्यासोबत लग्न झाले होते. लग्नामध्ये सहा लाख रुपये, सोन्याच्या अंगठ्या आणि एक तोळ्याची सोन्याची चेन असे ठरविण्यात आले होते. लग्नाच्या अगोदर काही रक्कम पान २ वर

### डंपर-रिक्षाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल-कळंबोली मार्गावर दुचाकी, रिक्षा आणि डंपरच्या झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. मुकुंद सोर्नी असे मृत तरुणाचे नाव असून, त्याचा मित्र संतोष मौर्या हा या अपघातात जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुकुंद सोर्नी आणि संतोष मौर्या हे दोघे दुचाकीवरून पनवेल येथे फिरण्यासाठी गेले होते. तेथून परतत असताना पनवेल-कळंबोली रस्त्यावर त्यांच्या दुचाकीचा रिक्षाला पान २ वर

## चाकरमान्यांच्या दिमतीला रायगडची एसटी

- १७८ बसेस मुंबई, पालघरला होणार रवाना
- कोकणातील गणेशभक्तांची होणार सोय

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मुंबई, पालघरमधील चाकरमानी कोकणात जाण्यासाठी सज्ज झाले आहेत. हजारो चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, यासाठी मुंबई, पालघरच्या एसटी महामंडळाने रायगड विभागाची मदत घेतली आहे. मुंबई, पालघर येथून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी शुक्रवार ते शनिवारी या तीन दिवसात १७८ एसटी बसेस रायगडमधून पाठविल्या जाणार आहेत.

कोकणातील असंख्य मंडळी मुंबई, पालघरमध्ये नोकरी, व्यवसायानिमित्त राहात आहेत. गणेशोत्सवाच्या निमित्ताने कोकणात रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्ये जाण्याची लगबग या चाकरमान्यांची सुरु झाली आहे. गणेशोत्सवासाठी दीड, पाच, सात, दहा दिवस सुट्टी काढून चाकरमानी त्यांच्या गावी दाखल होणार आहेत. चाकरमान्यांच्या सेवेसाठी एसटी महामंडळ सज्ज झाली आहे. मुंबई व पालघरमधील चाकरमान्यांना कोकणात घेऊन जाण्यासाठी एसटी महामंडळाने रायगड विभागाची मदत घेतली आहे. रायगड जिल्ह्यातून १७४ एसटी बसेस मुंबई, पान २ वर



### विद्यानगरमध्ये लाखांची घरफोडी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील विद्यानगरमध्ये घरफोडी करून चोरट्यांनी आठ लाख ११ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना रविवारी दुपार ते सायंकाळच्या दरम्यान घडली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील कार्ले येथील मूळचे रहिवासी असणारे रुपेश पाटील हे पान २ वर

## पोट फुगलेल्या उड्डाणपुलाचे 'डोहाळे जेवण'

### शरद पवार गटाचे ११ सप्टेंबरला आंदोलन

। नागोठणे । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील नागोठणे येथील उड्डाणपुलाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने अनोख्या पद्धतीने आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. नागोठण्यातील पुलाला तडे गेल्याच्या व पुलाचे पोट फुगल्याच्या पार्श्वभूमीवर पुलाचे डोहाळे जेवण हा उपरोधिक कार्यक्रम शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नागोठणे पुलावर होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडून पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे.



नागोठण्यातील पुलाच्या कामाचा दर्जा, बांधकामातील कथित त्रुटी आणि जनतेच्या पैशाचा झालेला अपव्यय याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, पुलाचे काम करणारी कंपनी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, जिल्हाधिकारी, संबंधित खात्याचे मंत्री, खासदार, आमदार तसेच कामाच्या दर्जाबाबत जबाबदार असलेल्या अभियंत्यांना पान २ वर




## वाहतूक पोलिसांची जय्यत तयारी

### शुक्रवारपासून महामार्गावर बंदोबस्त तैनात

प्रमोद जाधव

। रायगड ।

गणेशोत्सवाच्या आगमनाची चाहूल शिगेला पोहोचली आहे. बाप्पाच्या आगमनासह सजावट करण्यासाठी चाकरमानी गुरुवारपासून कोकणात दाखल होण्याची शक्यता आहे. भक्तांचा प्रवास सुखकर व आरामदायी होण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखा सज्ज झाली आहे. मुंबई-गोवा महामार्गासह रायगड जिल्ह्यातील प्रमुख मार्गांवर होणारी संभाव्य वाहतूक कोंडी आणि अपघातांचे आव्हान लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांनी जय्यत तयारी केली आहे. त्यासाठी होमगार्ड व अन्य सुरक्षा यंत्रणेची मदत घेतली जाणार आहे. शुक्रवारपासून वाहतूक पोलिसांचा महामार्गावर बंदोबस्त असणार असल्याची जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी दिली.

कृष्ण जन्माष्टमीनंतर गणरायाचे आगमन सोमवारी (दि.१४) घरोघरी होणार आहे. पान २ वर









# जुगार खेळणाऱ्यांनो सावधान!



● (छायाचित्र : महेश पवार)

। नागोठणे । प्रतिनिधी ।

आगामी गणेशोत्सव काळात नागोठण्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, गणेशोत्सव शांततेत व उत्साहात पार पडावा, यासाठी नागोठणे पोलिसांनी कंबर कसली आहे. गणेशोत्सवाच्या काळात पैसे लावून जुगार अथवा पत्ते खेळताना आढळल्यास जुगारयांवर थेट गुन्हे दाखल करण्यात येतील, असा सज्जड इशारा नागोठण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि रविंद्र पारखे यांनी सोमवारी (दि.७) नागोठणे पोलीस ठाण्यात संपन्न झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत दिला आहे.

सपोनि रविंद्र पारखे पुढे म्हणाले की, पैसे लावून पत्ते खेळण्यापेक्षा कॅरम, बुद्धिबळ यांसारखे मनोरंजनात्मक खेळ खेळा. नागोठणे शहर व विभागातील नागरिक अतिशय शांत व संयमी असून सर्व समाजबांधव गुण्यागोविंदाने सण-उत्सव साजरे करतात, असे सांगत त्यांनी नागोठणेकरांचे कौतुक केले.

गणेशोत्सव काळात सोशल मीडियाचा गैरवापर करू नये. कोणत्याही समाजाच्या भावना दुखावतील असे आक्षेपार्ह देखावे, पोस्ट अथवा मजकूर प्रसारित करू नये, अशा सूचना देऊन गणेशोत्सव मंडळांनी सामाजिक सलोखा व शांतता अबाधित ठेवण्यास सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी सपोनि रविंद्र पारखे यांनी केले. गणेशोत्सव काळात स्पीकर अथवा डीजेचा आवाज ७५ डेसिबलपेक्षा जास्त असता कामा नये, नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित साहित्य जमा करून स्पीकर व डीजे मालकांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

या बैठकीला रोह्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे, पोलीस कर्मचारी स्वप्निल भालेराव, ज्येष्ठ नेते कृष्णाजी धामणे, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, वीज वितरणचे सहाय्यक अभियंता सत्येंद्र सिंग, बाजारपेठ गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अंकुश जैन, हायवे नाका गणेशोत्सव मंडळाचे रामचंद्र देवरे, दत्ताराम झोलगे, धनंजय जगताप, बाळू रटाटे, शंकर भालेकर, बाबा मुल्ला, विकास जाधव, विजय पाटील, काशिनाथ शिद, महिला दक्षता समिती सदस्या शबाना मुल्ला, अपर्णा सुटे, संगिता पोलसानी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दांडगुरी हायस्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक सोहळा



(छायाचित्र : धम्मशील सावंत)

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

संस्थापक रा.पां. दिवेकर दांडगुरी हायस्कूलमध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडल्यास त्यांच्यातील आत्मविश्वासात भर पडते, असे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

या सोहळ्यात इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गांमधील गुणानुक्रमे प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच, सन २०२५-२६ च्या इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम आणि जिल्ह्यात ११ वा क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढवणाऱ्या तनुश्री जगनर हिचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे सभापती वसंत राऊत उपस्थित होते. याप्रसंगी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य दीपक फरांडे, दिलीप खेडेकर, दत्तात्रेय पालकर, रामचंद्र खोपकर, गणपत सोलकर, सुरेश मुजर व दिनेश ढोबळे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. सुजाता बापट व डॉ. वृषाली साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तिक पारितोषिके देऊन त्यांचा उत्साह वाढवला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संदीप गुरव यांनी केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी भागेश पाटील यांनी यशस्वीपणे पार पाडली, तर उपस्थितांचे आभार विश्वास खोत यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक वर्ग गणेश पाटील, विश्वास खोत, बाबुराव जगनर, पुष्पा गवळे, रसिका पाटील, नीलिमा करंबे व शिक्षकेत्तर कर्मचारी कुलाबकर यांनी मेहनत घेतली.



## खालापूर पोलिसांचा मठाच्या वतीने सन्मान

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर येथे नव्याने बांधण्यात आलेल्या श्री स्वामी समर्थ मठात झालेल्या धाडसी चोरीच्या गुन्ह्याचा अत्यंत जलद गतीने तपास करून आरोपींना जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. यामुळे पोलिसांचे मठाचे विश्वस्त व स्थानिक भाविकांनी कौतुक केल.

पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मठाच्या वतीने पोलीस अधिकारी व अंमलदारांचा विशेष सन्मान करण्यात आला. काही दिवसांपूर्वी खालापूर येथील श्री स्वामी समर्थ मठातून अज्ञात चोरट्यांनी मठाचे दरवाजे उघडे असल्याचा फायदा घेत चांदीचे आवरण असलेल्या पवित्र पादुका चोरून नेल्या होत्या. या घटनेमुळे रायगड जिल्ह्यात तसेच स्वामीभक्तांमध्ये संतापाची लाट उसळली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून खालापूर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली. सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्याचा छडा लावला. पोलिसांनी दाखविलेल्या शौर्य, तत्परता आणि कर्तव्यनिष्ठेमुळे मठाचे पावित्र्य तसेच भाविकांचा पोलिसांवरील विश्वास पुन्हा दृढ झाला आहे. याच कृतज्ञतेपोटी मठाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खालापूर पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. विशाल नेहुल, खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप रायन्नावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत हाके यांच्यासह अधिकारी व अंमलदारांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# जमीन एकाची; मोबदला दुसऱ्यालाच

■ भूसंपादनावरून शेतकऱ्याचा गंभीर आरोप

। खोपोली । प्रतिनिधी ।

''गोलमाल है बाबा, गोलमाल?'' हाळ-पळसदरी राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणासाठी झालेल्या भूसंपादनाच्या मोबदल्यावरून अंजरुण येथील शेतकरी अशोक गोपाळ पिंगळे यांनी प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आपल्या मालकीची जमीन संपादित करून त्याचा सुमारे दीड कोटी रुपयांचा मोबदला दुसऱ्याच्या खात्यावर जमा करण्यात आल्याचा दावा पिंगळे यांनी केला आहे. त्यामुळे भूसंपादनाच्या प्रक्रियेतील कागदपत्रे, निर्णय आणि मोबदला वितरणाची फेरतपासणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पिंगळे यांच्या म्हणण्यानुसार, मौजे अंजरुण १/२/अ येथील जमीन त्यांच्या एकट्याच्या नावावर आहे. २००८ सालचे खरेदीखत, सातबारा उतारा तसेच अन्य मालकी हक्काचे पुरावे आपल्याकडे असल्याचे ते सांगतात. असे असतानाही भूसंपादनाच्या नोटिशीत जुन्या मालकांची नावे आल्याने वाद निर्माण झाला.

**कागदपत्रे एका बाजूला; निर्णय दुसऱ्याच बाजूने?**

सर्व्हे क्रमांक १०-ब मधील ३५.२ गुंठे जमिनीपैकी १९८९ मध्ये ८ गुंठे आणि उर्वरित २७.२ गुंठे जमीन २००८ मध्ये खरेदी केल्याचे पिंगळे यांचे म्हणणे आहे. २००९ मध्ये संपूर्ण जागेला दगडी कंपाउंड केल्याचे सांगत त्याचे गुगल अर्थवरील छायाचित्रेही उपलब्ध असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

भूसंपादनाच्या नोटिशीनंतर या प्रकरणात तीन वेळा सुनावणी झाली. १ जुलै २०२६ रोजीच्या सुनावणीत निर्णय आपल्या विरोधात गेल्याचे सांगण्यात आले; मात्र निर्णयाची प्रत वेळेत मिळाली नसल्याचा आरोप पिंगळे यांनी केला आहे. त्यानंतर कागदपत्रांसाठी कार्यालयीन पातळीवर पाठपुरावा करावा लागला. मोबदल्याची रक्कम आधीच दुसऱ्याच्या खात्यावर जमा झाल्याचे समजल्याने हा प्रकार समोर आल्याचे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रकरणात आता सर्वाधिक चर्चेत असलेला प्रश्न म्हणजेजमीन कोणाच्या मालकीची होती आणि भूसंपादनाचा मोबदला नेमका कुणाला देण्यात आला?

पिंगळे यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. खरेदीखत, सातबारा, फेरफार नोंदी, भूसंपादनाची अधिसूचना, सुनावणीचे इतिवृत्त, अंतिम आदेश आणि मोबदला कोणाच्या खात्यावर जमा झाला याची अधिकृत नोंद तपासली गेल्यासच या प्रकरणातील सत्य स्पष्ट होईल.

शेतकऱ्याची जमीन शासनाच्या प्रकल्पासाठी गेली; आता त्याचा हक्काचा मोबदला कुणाच्या खात्यात गेला, हा प्रश्न अनुत्तरित आहे. प्रशासनाच्या कागदपत्र तपासणीतून या आरोपांमागचे वास्तव काय आहे, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

> “ भूसंपादनाच्या अनेक प्रकरणांत एका जागेवर एकापेक्षा अधिक व्यक्ती मालकी हक्क सांगतात. अशा वेळी दोन्ही पक्षांना रीतसर नोटिसा देऊन त्यांची कागदपत्रे व पुरावे तपासले जातात. या प्रकरणातही दोन्ही पक्षांना बोलावून त्यांच्या वकिलांमार्फत बाजू ऐकून निर्णय देण्यात आला आहे. माझ्यासमोर सादर झालेली कागदपत्रे व पुरावे तपासूनच निर्णय दिलेला असून, माझ्या मते तो योग्य आहे. या निर्णयाच्या विरोधात संबंधितांना दिवाणी न्यायालयात दाद मागता येईल.
>
> – प्रकाश संकपाळ, प्रांताधिकारी, कर्जत ”

# प्रशासनावरील आरोपांबाबत वस्तुस्थितीनिहाय स्पष्टीकरण

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत तसेच मुख्याधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांबाबत करण्यात येत असलेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नाही, हे नगरपरिषद प्रशासनाच्यावतीने स्पष्ट करण्यात येत आहे. नगरपरिषदेमार्फत करण्यात येणारी विकासकामे, खरेदी प्रक्रिया, आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कार्यवाही ही संबंधित अधिनियम, शासन निर्णय, नियम व प्रचलित प्रशासकीय कार्यपद्धतीनुसार करण्यात येते. प्रत्येक कार्यवाही उपलब्ध अभिलेख, मंजुरी, अंदाजपत्रक, निविदा प्रक्रिया व संबंधित कागदपत्रांच्या आधारे केली जाते. नगरपरिषद प्रशासन शासकीय ध्येयं धोरणे, नियमबद्धता, पारदर्शकता व उत्तरदायित्व या तत्त्वांनुसार काम करीत असून, मुख्याधिकारी अथवा प्रशासनाकडून कोणताही आर्थिक किंवा प्रशासकीय गैरव्यवहार झालेला नाही. त्यामुळे अपूर्ण अथवा चुकीच्या माहितीच्या आधारे करण्यात येणाऱ्या आरोपांमुळे नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण करू नये, अशी विनंती खोपोली नगरपरिषद प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

**ग्रुप ग्रामपंचायत जासई**
**मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड**
**जाहिर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत जासई अंतर्गत खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधितून वस्तू खरेदी कामी मान्यता प्राप्त पुरवठा दारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉर्मची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. ३ मधील सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत जासई गावातील कुरूंडा विहीरीपासून ते घरत आळी देवाऱ्यापर्यंत नविन गटार बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२०२५ | ३,१३,२२८/- | ३,१३२/- | ५०० | ६ महिने |
| २ | वॉर्ड क्र. २ मधील खंडोबा मंदिरापासून ते सुनाद म्हात्रे यांचे घरापर्यंत गटार बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२०२६ | ३,४२,१५२/- | ३,४२१/- | ५०० | ६ महिने |
| ३ | जासई अंतर्गत दास्तानफाटा स्मशानभुमी जवळ पाण्याची साठवण टाकी बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२०२५ | २,५०,०००/- | २,५००/- | ५०० | ६ महिने |
| ४ | जासई अंतर्गत सुरूंगपाडा स्मशानभूमी जवळ पाण्याची साठवण टाकी बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२०२५ | २,५०,०००/- | २,५००/- | ५०० | ६ महिने |

अटी व शर्ती

१. दरपत्रक मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक ०९/०९/२०२६ ते १६/०९/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर खरेदी वस्तूंची किमत हि PFMS प्रणाली द्वारे अदा करण्यात येईल.

ठिकाण:- जासई
दिनांक :- ०९/०९/२०२६

**ग्राम पंचायत अधिकारी** — **ग्रुप ग्राम पंचायत जासई**
**सरपंच** — **ग्रुप ग्राम पंचायत जासई**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, तळमजला, महर्षी कर्वे रोड, अलिबाग, जि. रायगड पिन कोड ४०२ २०१**
Email ID : ddr_red@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/कात-०४/अपसेट प्रा. नोटीस/अलिबाग अर्बन बँक/सन २०२६/१७०३ दिनांक - ०७-०९-२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (११) अन्वये नोटीस**

वसुली अधिकारी
अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि. अलिबाग --अर्जदार
महर्षी कर्वे रोड, ता.अलिबाग, जि.रायगड

**विरुद्ध**

१. श्री. वैभव हेमकिरण काळे (कर्जदार)
सर्वे नं. ८५/८६ प्लॉट नं.११०१, कल्पतरु इस्टेट पिपळे गुरव पुणे ३३ --गैरअर्जदार
२. श्री. देवण अरुण यादव
मु. कचेरी रोड, ता. कर्जत, जि. रायगड
३.श्री. विलास वासुदेव थोरवे
मु.पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड

अर्जदार संस्थेकडून कर्जदार/गैरअर्जदार यांनी घेतलेले कर्ज थकीत झालेमुळे सदर संस्थेने गैरअर्जदार यांचेविरुद्ध प्राप्त केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत वसुलीचे प्रमाणपत्राची अंमलबजावणी अर्जदार संस्थेचे वसुली अधिकारी यांचेमार्फत करण्यात येत असून त्याकरीता संबंधित वसुली अधिकारी यांनी खालील मालमत्ता जप्त करुन सदर मालमत्तेची जाहीर लिलावाने विक्री करणेसाठी सदर मालमत्तेचे मुल्य रक्कम ही वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव दाखल केला आहे.

| अ.क्र. | मालमत्ता मालकाचे नाव | मालमत्ता स्थळ | मालमत्ता वर्णन/तपशील | शासकीय दराने मुल्य | बाजारभाव दराने मुल्य | डीस्ट्रेस व्हॅल्यू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. विलास वासुदेव थोरवे | मौजे पोसरे ता.कर्जत येथील मालमत्ता | मौजे पोसरे ता.कर्जत येथील मालमत्ता भुमापन क्र. व उपविभाग क्र. ६७/३, ०-३८-०० पो.ख.०-०१-०० एकूण ०-३९-०० | ८५,२६,०९६/- | ९३,६०,०००/- | ७४,८८,०००/- |

मालमत्ताधारक आणि त्यातील हितसंबंधी यांनी सदर रकमेस वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणून मान्यता का देण्यात येवू नये? याबाबत प्रतिवादी यांना म्हणणे मांडण्यासाठी दि. २७-०८-२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीस हजर राहण्याकरिता कर्जदार व जामिनदार यांना रजिस्टर पोस्टाने नोटीस बजावण्यात आलेली होती, मात्र गैरअर्जदार हे हजर न राहिल्याने त्यांच्या निदर्शनास येण्याकरिता त्यांना पेपर नोटीसीद्वारे कर्जदार व जामिनदार यांना संधी देण्यात येत आहे. तरी त्यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर दिनांक २२-०९-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. आवश्यक पुराव्यासह उपस्थित रहावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून आपले गैरहजेरीत सुनावणी कामकाज पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**(तनवीर पाटील)**
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड-अलिबाग**

पान १ वरून

## सासरच्या जाचामुळे विवाहितेची आत्महत्या

देण्यात आली होती. मात्र, शिल्लक राहिलेली रक्कम व दागिन्यांचा ऐवज मिळविण्यासाठी विवाहित महिलेचा वारंवार छळ केला जात होता. तसेच अलिबागमध्ये जमीन खरेदी करण्यासाठी माहेरून पैसे आणण्याचा दबाव टाकत होते. पतीसह सासरच्या मंडळीकडून होणाऱ्या मानसिक व शारीरिक जाचाला कंटाळून विवाहित महिलेने गळफास घेऊन जीवन संपविले. सासरच्या जाचाला कंटाळून विवाहित महिलेने आत्महत्या केल्याचा ठपका ठेवत प्रध्युमन गुप्ता, जोखन गुप्ता, मंजू गुप्ता या तिघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही मंडळी मूळची उत्तर प्रदेश राज्यातील असून, सध्या विद्यानगर येथे राहात असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कपिले करीत आहेत.

## डंपर-रिक्षाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

अपघात झाला.

तपासादरम्यान रिक्षाचालकाने अचानक रिक्षा वळवल्यामुळे दुचाकी रिक्षाला धडकल्याचे समोर आले. धडकेनंतर दुचाकीस्वार रस्त्यावर पडला. त्याचवेळी मागून येणाऱ्या डंपरचे चाक त्याच्यावरून गेल्याने मुकुंद याचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात संतोष मौर्या जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार करण्यात येत आहेत. घटनेची माहिती मिळताच खांदेश्वर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी रिक्षाचालकासह डम्परचालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## कोकणकर टोलमुक्त

मोठी बचत होणार आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी याबाबत माहिती दिली. गणेशोत्सवाच्या काळात महामार्गांवर वाढणारी गर्दी लक्षात घेऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस, वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि एसटी महामंडळाच्या समन्वयातून विशेष नियोजन करण्यात आले आहे.

## गणेशोत्सवात महामार्गावर अवजड वाहनांना बंदी

लागू करण्यात आले आहेत.

या वाहनांना बंदीतून सवलत

प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून दूध, पेट्रोल, डिझेल, एलपीजी सिलिंडर, औषधे, लिक्विड ऑक्सिजन, भाजीपाला, अन्नधान्य व नाशवंत माल वाहून नेणाऱ्या वाहनांना बंदीतून सवलत देण्यात आली आहे. तसेच रुग्णवाहिका, पोलीस, अग्निशमन, आपत्ती व्यवस्थापन व अन्य अत्यावश्यक सेवांच्या वाहनांनाही निर्बंध लागू राहणार नाहीत. जेएनपीटी व जयगड बंदरातून आयात-निर्यात मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांनाही सवलत देण्यात आली आहे.

## चाकरमान्यांच्या दिमतीला रायगडची एसटी

पालघरमधून कोकणात जाणार आहेत. शुक्रवारी (दि. ११) ५२, शनिवारी (दि.१२) ७४ आणि रविवारी (दि.१३) ५२ एसटी बसेस कोकणात पाठविल्या जाणार आहेत. त्याची तयारी पूर्ण झाली आहे. रायगड विभागाकडून नियोजन करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. तसेच महाड तालुक्यातील गावांमधील भक्तांना मुंबई, ठाणे, कल्याण, बोरीवली, पुणे, विद्याविहार, नालासोपारा येथून आणण्यासाठी ग्रुप बुकिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. तब्बल ७४ एसटी बसेस यासाठी बुक करण्यात आल्या आहेत. या भागातील गणेशभक्त महाड तालुक्यामधील अनेक गावांमध्ये थेट एसटीतून पोहोचणार आहेत. तसेच अलिबाग तालुक्यातही नोकरी व्यवसायानिमित्त चाकरमानी आहेत. या चाकरमान्यांना गणेशोत्सवामध्ये थेट अलिबागहून माणगाव, महाड, चिपळूण, खेड, कणकवली, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर, सावंतवाडी अशा अनेक भागांमध्ये जाण्यासाठी अलिबाग एसटी बस आगारातून अलिबाग-सावंतवाडी ज्यादा एसटी बस सुरु करण्यात येणार आहे. अकरा व बारा सप्टेंबर अशी दोन दिवस ही सेवा सुरु राहणार असल्याची माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली.

## विद्यानगरमध्ये लाखांची घरफोडी

विद्यानगर येथील प्रमिला हाऊसिंग सोसायटीमध्ये सध्या राहात आहेत. रविवारी (दि.६) दुपारपासून यांचे घर बंद होते. दुपारी साडेतीन ते साडेपाच वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप तोडले. त्यानंतर घरात घुसून कपाटातील लॉकरमधील सोन्याचे व चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण आठ लाख ११ हजार पाचशे रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. यामध्ये आठ हजार रुपयांची रोकड, साडेतीन लाख रुपयांचे मंगळसूत्र, ४९ हजार रुपये आणि एक लाख ७५ हजार रुपयांचे दोन सोन्याचे हार, ७० हजार रुपयांची सोन्याची चेन, सोन्याचे ब्रेसलेट, अंगठ्या, नथ, तसेच कमरेचा छल्ला, साखळी, कडे आदी चांदीच्या ऐवजाचा समावेश आहे.

## पोट फुगलेल्या उड्डाणपुलाचे ‘डोहाळे जेवण’

या डोहाळे जेवण कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आल्याचे पक्षाने म्हटले आहे.

रवींद्र चव्हाण यांनी पुलाच्या कामाच्या दर्जावर तीव्र नाराजी व्यक्त केली. जनतेच्या पैशाचे वाटोळे करून अखेर जनतेच्या हाती धुपाटणे आले आहे. पुलाच्या कामातील कथित गैरप्रकार आणि भ्रष्टाचाराचा जाब संबंधितांकडून विचारला गेला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. पुलाच्या कामाची गुणवत्ता, अभियंत्यांची जबाबदारी आणि संबंधित यंत्रणांच्या देखरेखीबाबत सखोल चौकशी करण्याची मागणीही पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या अनोख्या आंदोलनातून प्रशासनाचे आणि संबंधित लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

सदर पुलाला बाळंतपणाच्या कळा लागल्यामुळे अवजड वाहतूक सर्विस रोडवर वळविण्यात आली आहे. दरम्यान, पुलाच्या संरचनेत समस्या निर्माण झाल्याने जड वाहनांची वाहतूक या पुलावरून बंद करून सर्व्हिस रोडवर वळविण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशभक्तांची गैरसोय टाळण्यासाठी पुलावरून हलकी वाहने सोडण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात येणार असल्याचे समजते. पेपर फुटीतून आलेले अभियंता, व भ्रष्टाचारी नेते यांचं या उड्डाणपूलने बिंग फोडलं, अशी प्रतिक्रिया जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

## वाहतूक पोलिसांची जय्यत तयारी

कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात साधारणपणे साडेतीन लाख गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, रायगड जिल्ह्यात एक लाख पाच हजार ३४५ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. गणरायाचे आगमनाचे वेध लागले असून, मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण, बोरीवलीसह विविध जिल्ह्यातील राज्यांमध्ये वास्तव्यास असलेल्या चाकरमान्यांची कोकणासह रायगड जिल्ह्यात येण्याची तयारी सुरु झाली आहे. काहीजण एसटी बसने, तर काही जण खासगी वाहनाने तर काही जण रेल्वेने त्यांच्या गावी दाखल होणार आहेत.

गणरायाचे आगमन अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपले आहे. त्यामुळे येत्या दहा ते अकरा सप्टेंबरपासून चाकरमानी कोकणात दाखल होणार आहे. या कालावधीत मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ राहणार आहे. वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे चाकमान्यांचा सुखकर प्रवास व्हावा, त्यांना त्यांच्या निश्चित स्थळी वेळेवर पोहोचता यावे, यासाठी जिल्हा वाहतूक पोलिसांनी तयारी केली आहे. वाहतूक सुरळीत ठेवण्याचे मोठे आव्हान वाहतूक पोलिसांसमोर असणार आहे. हे आव्हान पेलण्यासाठी ६५ वाहतूक पोलीस शुक्रवारपासून महामार्गावर बंदोबस्तासाठी असणार आहे. त्यांच्या मदतीला शंभर होमगार्डसह ६० पोलीस अधिकारी असणार आहेत. त्यामध्ये पोलीस उपनिरीक्षकांसह सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस उपअधीक्षकांचा समावेश असणार आहे. पोलीस ठाण्यातील २११ पोलीस कर्मचाऱ्यांचा फौजफाटा बंदोबस्तासाठी तैनात असणार आहे.

**वॉकीटॉकीसह बिनतारी संच**

मुंबई-गोवा महामार्गावर शुक्रवारपासून वाहनांची गर्दी होण्याची शक्यता आहे. माणगाव, नागोठणे, इंदापूरमध्ये वाहतूक कोंडींचा फटका कायमच बसत आला आहे. ही समस्या सोडविण्यासाठी निजामपूरमार्गे बायपास पर्यायी व्यवस्था केली जाणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीचा साधारणतः तीस टक्के फरक पडेल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. वाहतूक कोंडीसह एखादा अपघात रोखण्यासाठी आधुनिक यंत्राद्वारे समन्वय साधला जाणार आहे. त्यासाठी २७ वॉकीटॉकी, दहा बिनतारी संच उपलब्ध केले जाणार आहेत. यातून तात्काळ संपर्क साधून वाहतूक कोंडी सुरळीत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावर १० क्रेन आणि २ हायड्रा तैनात ठेवण्यात येणार आहेत. तसेच तातडीच्या उपचारासाठी दहा रुग्णवाहिका सज्ज असणार असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली आहे.

**गणेशोत्सवाच्या निमित्ताने कोकणासह रायगड जिल्ह्यात चाकरमानी विशेष म्हणजे गणेशभक्त दोन दिवसांमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. महामार्गावरून त्यांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, यासाठी जिल्हा वाहतूक शाखेने तयारी केली आहे. पोलीस ठाण्यातील कर्मचारी, होमगार्डचीदेखील मदत घेतली जाणार आहे. माणगाव, इंदापूरमध्ये होणारी वाहतूक कोंडी रोखण्यासाठी वाहनांसाठी पर्यायी व्यवस्था केली आहे.**

**– सचिन पवार, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड**

# महामार्गावर मोकाट गुरांचा हैदोस

- गणेशोत्सवापूर्वी तातडीने बंदोबस्त करा
- शरदचंद्र पवार गटाचा प्रशासनाला अल्टीमेटम

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

सध्या संपूर्ण कोकण पट्ट्यात राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अगदी गावाकडच्या मुख्य रस्त्यांवर मोकाट गुरांनी ठिय्या मांडला आहे. रात्रीच्या अंधारात रस्त्याच्या मधोमध बसलेली ही गुरे वाहनचालकांना अजिबात दिसत नाहीत, त्यामुळे भीषण आणि प्राणघातक अपघातांचे सत्र सुरू झाले आहे. या मोकाट गुरांमुळे नुकतेच उरण येथे एका निष्पाप दुचाकीस्वाराला अत्यंत दुर्दैवीरित्या आपला जीव गमवावा लागला आहे. काही दिवसांवर गणोशोत्सव येऊन ठेपला असून, सणाच्या कालावधीत कोणाचा बळी जाऊ नये म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने प्रशासनाला अल्टीमेटम दिला आहे.

काही दिवसांवरच गणेशोत्सव येऊन ठेपला आहे. या सणासाठी मुंबई-गोवा महामार्गासह इतर राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अगदी गावाकडच्या मुख्य रस्त्यांवरून मुंबई, पुणे आणि राज्यभरातून लाखो चाकरमानी रायगड जिल्ह्यासह कोकणातील आपल्या गावी कोकणात दाखल होणार आहेत. त्यामुळे रस्त्यांवर वाहनांची अभूतपूर्व गर्दी होणार हे उघड आहे. मात्र, रस्त्यांवर मोकाट गुरांनी मांडलेला ठिय्या चाकरमान्यांसाठी जिवघेणा ठरत आहे. रात्रीच्या घट्ट अंधारात रस्त्याच्या मधोमध बसलेली ही गुरे वाहनचालकांना अजिबात दिसत नाहीत, त्यामुळे भीषण आणि प्राणघातक अपघातांचे सत्र सुरू झाले आहे. त्यामुळे गणेशोत्सव काळात गर्दीच्या वेळी आणखी भीषण अपघात होण्याची शक्यता वाहनचालकांमधून वर्तविली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने या गंभीर समस्येकडे डोळेझाक केली, तर रस्त्यांवर रक्ताचा सडा पडण्याची भीती निर्माण झाली आहे. अलीकडेच झालेल्या शांतता समितीच्या बैठकीतही या ज्वलंत प्रश्नावर कोणताही ठोस निर्णय न झाल्याने चाकरमान्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे.


(संग्रहीत छायाचित्र)

दरम्यान, उद्या आणखी कोणाचा बळी जाऊ नये म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने प्रशासनाला अल्टीमेटम दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे रायगड जिल्हा संघटक तथा श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष अझहर धनसे यांनी जिल्हा प्रशासन, विभागीय आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यां थेट निवेदनाद्वारे तीव्र इशारा दिला आहे. त्यांनी या निवेदनातुन, सर्व महसूल व ग्रामविकास यंत्रणेने (तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी) आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या गुरांच्या मालकांचा तात्काळ शोध घ्यावा. संबंधित गुरांच्या मालकांना कार्यालयात बोलावून लेखी पत्र द्यावे आणि गुरे रस्त्यावर मोकाट न सोडण्याबाबत दोन वेळा कडक इशारा द्यावा. आणि दोन वेळा समज देऊनही तिसऱ्यांदा तीच गुरे रस्त्यावर आढळल्यास ती तात्काळ जप्त करून गोशाळेत जमा करावीत आणि निष्काळजी मालकांवर कडक कायदेशीर गुन्हे दाखल करावेत, अशा मुख्य तीन मागण्या केल्या आहेत.

> ही मोहीम केवळ कागदावर आणि एसी केबिनमध्ये न राहता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून राबवली पाहिजे. प्रशासनाने गणेशोत्सवापूर्वी तातडीने कारवाई केली नाही, तर जनतेच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण रायगड जिल्ह्यात तीव्र जन-आंदोलन छेडण्यात येईल. त्यानंतर निर्माण होणाऱ्या सर्व परिस्थितीला प्रशासनच सर्वस्वी जबाबदार राहील.
>
> – अझहर धनसे, जिल्हा संघटक, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)

## निवडक



### संत सेना महाराजांना अभिवादन

**अलिबाग :** संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त अलिबाग शहर नाभिक समाज संघटनेच्यावतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या पुण्यतिथीनिमित्त अलिबाग नगरपरिषदेचे वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांनी संत सेना महाराज यांना विनम्र अभिवादन केले. तसेच, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे आणि संजना किर यांनीही संत सेना महाराजांना अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संत सेना महाराजांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याला अभिवादन करण्यात आले. संत सेना महाराजांनी समाजाला दिलेली समता, सेवा, भक्ती आणि बंधुभावाची शिकवण आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. या पुण्यतिथी कार्यक्रमास समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत सेना महाराजांच्या आशीर्वादाचा लाभ घेतला.



### नेरळमध्ये वाहतूक कोंडीवर चर्चा

**नेरळ :** नेरळ येथील रेल्वे फाटक आणि बाजारपेठ येथील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी शांतता समितीच्या बैठकीत विशेष चर्चा करण्यात आली. सणाच्या काळात बाजारपेठमध्ये वाहतूक कोंडी होणार नाही, यासाठी अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. तर मालवाहतूक बाबत वेळ निश्चित करून आणि नेरळ गावाचा पर्यायी रस्ता यांच्या वापरावर विशेष चर्चा करण्यात आली. नेरळ पोलीस ठाणे शांतता समितीची बैठक प्रभारी अधिकारी राहुल वरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्य शांतता समितीची सभेला निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत, कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे, जिल्हा परिषद माजी सदस्य सावळाराम जाधव यांच्यासह महावितरण सहायक अभियंता दीक्षांत वाघ, सूर्यकांत वाघमारे, ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले, संजय राठोड आणि पोलीस उपनिरीक्षक सुशील काजरोलकर आदी उपस्थित होते.

### विद्यालयामार्फत 'वृक्ष वाढदिवस' साजरा

**रायगड :** पेण तालुक्यातील अक्षर विद्यालयाने वृक्षारोपणासह वाढदिवसाची २६ वर्षांची परंपरा जपली आहे. इको फ्रेंडली स्कूल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विद्यालयामध्ये 'वृक्ष वाढदिवस' हा उपक्रम राबविण्यात आला. हा सोहळा पेणचे नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. ग्रामीण व शहरी भागाचा विकास होत असताना झाडांची तोड होते. मात्र, त्याठिकाणी पुन्हा झाडे लावली जात नाही. त्याचा परिणाम पर्यावरण होतो. त्यामुळे शालेय स्तरापासून वृक्षारोपणाचे महत्त्व निर्माण व्हावे, म्हणून पेणमधील अक्षर विद्यालयाच्यावतीने दरवर्षी वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविला जातो. आतापर्यंत अनेक झाडांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे काम या विद्यालयाच्या मार्फत करण्यात आले आहे. हा गौरवशाली उपक्रम गेल्या २६ वर्षांपासून अक्षर विद्यालयाने हाती घेतला आहे. अक्षर विद्यालयाने वनराई तयार केली आहे. तसेच, शाळेत रोपांची लागवड करून त्या झाडांना जगवून त्यांचा वाढदिवस साजरा केला जातो. मानवाप्रमाणे झाडांनाही दिर्घायुष्य मिळो, अशी या मागची भावना आहे. यादरम्यान, मुलांप्रमाणे झाडांचाही केक कापून वाढदिवस साजरा केला जातो. अक्षर विद्यालयाने सुरू केलेला हा उपक्रम राज्यातील इतर शाळा व सेवाभावी संस्थामार्फत राबविला जात असून, विद्यालयाने सुरू केलेला वृक्ष वाढदिवस हा उपक्रम देशातील एकमेव असल्याचे बोलले जात आहे. नुकताच नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांच्या प्रमुख उपस्थित वृक्ष वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष विजय पाटील, संचालक राहूल म्हात्रे, प्रदिप म्हात्रे, सामाजिक वनीकरणाचे समीर पवार, वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### पादुका चोरणाऱ्या संशयितांना अटक

**खोपोली :** खालापूर येथील स्वामी समर्थ मठातील मंदिरातून चोरट्यांनी तब्बल १ लाख ६५ हजार रुपये किमतीच्या चांदीच्या पादुका लंपास केल्या होत्या. या प्रकरणी दोन संशयितांना अवघ्या चार दिवसांत पुणे परिसरातून अटक करण्यात खालापूर पोलिसांना यश आले आहे. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि पोलिसांची सतर्कता यामुळे मंदिर चोरीच्या प्रकरणाचा अल्पावधीत छडा लागला असून, पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक होत आहे. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. चोरीला गेलेल्या चांदीच्या पादुका तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या वाहनाबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



● पेढांबे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शेकापचे रूपेश पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल अनिल पाटील, अभिषेक पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन जल्लोष साजरा केला. दरम्यान, शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील आणि राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनीही रुपेश पाटील यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# बाळाराम पाटील यांची आयुक्तांशी चर्चा

## पनवेलमधील प्रलंबित विकासकामांना गती



| खांदेश्वर | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रलंबित विकासकामांना गती देणे आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची प्रभावी सोडवणूक करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्यासोबत शेकाप नेते तथा माजी आमदार बाळाराम पाटील यांच्यासह नगरसेवक व पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

यावेळी पडघे, रोहिजण, धरणा कॅम्प आणि नावडे परिसरातील अंतर्गत रस्ते व गटारांच्या विकासकामांचा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित करण्यात आला. या भागांतील प्रलंबित कामे मार्गी लावून नागरिकांना चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. वळवली आणि टेंभोडे परिसराला जोडणारा रिंग रोड तयार करण्याबाबतही चर्चा झाली. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी या मार्गाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच, नावडे झोपडपट्टी परिसरातील पुलाजवळील काँक्रीटीकरण, झोपडपट्टी पुनर्वसन आणि नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. नागरिकांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवून विकासकामांना गती देण्याची मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. तसेच, पालिका क्षेत्रात वेगाने वाढत असलेल्या लोकसंख्येच्या अनुषंगाने दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले. दरम्यान प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन नियोजनबद्ध कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या बैठकीला माजी आमदार बाळाराम पाटील, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, कृउबा समितीचे सभापती देवेंद्र मढवी, नगरसेवक राम पाटील, लतीफ शेख, योगिता फडके, मनीषा म्हात्रे, आर्या जाधव, अर्चना भोईर, दिलीप कदम तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# बांधकामांच्या साहित्यांमुळे नागरीकांची वाताहत



| खांदेश्वर | प्रतिनिधी |

खांदा वसाहतीमध्ये सध्या विविध ठिकाणी पुनर्विकासाची कामे जोरात सुरू आहेत. मात्र, या बांधकामांच्या साहित्यांमुळे नागरिकांसाठी असलेल्या फूटपाथवरच अतिक्रमण होत असल्याचे चित्र आहे. कुठे ग्रेती-खडीचे ढीग, तर कुठे लोखंडी सळ्या आणि इतर बांधकाम साहित्य थेट फूटपाथवर ठेवण्यात येत आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना फूटपाथ सोडून रस्त्यावरून चालण्याची वेळ येत असून, अपघाताची शक्यता वाढली आहे. विशेषतः या मार्गावरून दररोज विद्यार्थी ये-जा करतात. दरम्यान, फुटपाथ नागरिकांसाठी की बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी? असा सवाल आता खांदा वसाहतकरांकडून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे या प्रकाराकडे पनवेल महानगरपालिकेच्या कोणत्याही संबंधित विभागाचे लक्ष नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

# सिडकोच्या गृहनिर्माण योजनेला प्रतिसाद

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

सिडकोच्या ऑगस्ट २०२६ गृहनिर्माण योजनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, योजनेअंतर्गत विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या ४,७९३ घरांसाठी एकूण ४,१८० अर्जदारांनी स्वारस्य नोंदविले आहे. ही घरे नवी मुंबईतील तळोजा, खारघर आणि कळंबोली या नोड्समध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे उपलब्ध करून देण्यात आली असून, पात्र नागरिकांना नवी मुंबईत परवडणाऱ्या दरात घर घेण्याची संधी मिळाली आहे.





# रोह्यातील मूर्तिकारांची अहोरात्र धावपळ

| चणेरा | प्रतिनिधी |

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने रोहा तालुक्यासह परिसरातील गणपती मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये सध्या लगबग वाढली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून मेहनत घेऊन साकारलेल्या गणेशमूर्तींना अंतिम आणि आकर्षक रूप देण्यासाठी मूर्तिकार व त्यांचे सहकारी अहोरात्र मेहनत घेत आहेत. कार्यशाळांमध्ये सुरू असलेल्या रंगकाम, नक्षीकाम आणि सजावटीच्या कामामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे.

रोहा तालुक्यातील कार्यशाळांमध्ये लहान आकारापासून ते मोठ्या आकारापर्यंत विविध प्रकारच्या गणेशमूर्ती पाहायला मिळत आहेत. बदलत्या काळानुसार गणेशभक्तांच्या आवडी-निवडी लक्षात घेऊन पारंपरिक तसेच आधुनिक कलाकुसरीच्या मूर्ती साकारण्यात आल्या आहेत. ग्राहकांच्या मागणीनुसार मूर्तींच्या रंगसंगतीपासून ते मुकुट, अलंकार आणि सजावटीपर्यंत विशेष काळजी घेतली जात आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण भागातील गणेशभक्तांकडून मूर्तींची पाहणी व बुकिंग करण्यासाठी मूर्तिकारांच्या कार्यशाळांना मोठ्या प्रमाणात भेटी दिल्या जात आहेत. त्यामुळे मूर्तिकारांच्या कामाचा वेग आणखी वाढला असून, वेळेत सर्व मूर्ती पूर्ण करून त्या भक्तांच्या घरी सुरक्षितपणे पोहोचविण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. मातीपासून गणेशमूर्ती साकारण्यापासून ते रंगकाम, नक्षीकाम, सजावट आणि अखेर मूर्ती भक्तांच्या घरी पोहोचविण्यापर्यंतचा प्रवास मोठ्या मेहनतीचा असतो. सण जवळ आल्याने या सर्व कामांची वेळेत पूर्तता करण्यासाठी मूर्तिकार आणि त्यांचे सहकारी दिवस-रात्र कार्यरत आहेत. अनेक कार्यशाळांमध्ये रात्री उशिरापर्यंत काम सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

# गणरायाच्या आगमनासाठी मूर्तिकारांची लगबग

| नारंगी | प्रतिनिधी |

गणेशोत्सवाला अवघे पाच दिवस उरल्याने गणरायाच्या आगमनाची चाहूल लागली असून, शहरासह ग्रामीण भागातील मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये लगबग वाढली आहे. विविध आकारांच्या आकर्षक गणेशमूर्तींवर अखेरचा हात फिरविला जात असून, रंगकाम, सजावट, मुकुट, दागिने आणि नक्षीकाम पूर्ण करण्यासाठी कारागिरांची दिवसरात्र धावपळ सुरू आहे. मापगावातील साई-प्रसाद कला केंद्रात देखील गणेशमूर्तींना अंतिम रूप देण्यासाठी कारागिरांची लगबग वाढली आहे.



गणेशोत्सवासाठी दरवर्षी विविध आकारांच्या व आकर्षक स्वरूपातील गणेशमूर्तींना मोठी मागणी असते. यंदाही घरगुती तसेच सार्वजनिक मंडळांसाठी मूर्ती तयार करण्याचे काम काही महिन्यांपासून सुरू आहे. गणरायाला आकर्षक रूप देताना कारागीर मूर्तीच्या चेहऱ्यावरील भाव, डोळे, मुकुट, हातातील आयुधे तसेच वस्त्रालंकार याकडे बारकाईने लक्ष देत आहेत. मूर्ती अधिक सुंदर व देखणी दिसावी यासाठी विविध रंगछटा आणि पारंपरिक सजावटीचा वापर केला जात आहे. गणेशोत्सव जवळ आल्याने मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये कामाचा वेग वाढला आहे.

> 'बाप्पाच्या आगमनाला आता अवघे काही दिवस उरल्याने कामाचा वेग वाढविला आहे. मूर्तीची घडण, रंगकाम आणि सजावट यातील प्रत्येक टप्पा काळजीपूर्वक पूर्ण केला जात आहे. भक्तांच्या पसंतीस उतरतील अशा सुंदर आणि आकर्षक मूर्ती तयार करण्याचा प्रयत्न आहे.'
>
> – विलास राणे, साई-प्रसाद कला केंद्र, मापगांव




अवघ्या ५व्या वर्षी देशात प्रथम | रायगडसह महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

# अलिबागच्या आयान पाटीलची गरुडझेप

| अलिबाग | प्रतिनिधी |

राष्ट्रीय स्तरावर 'इंडियन नॅशनल एरोस्पेस अँड कॅनसॅट चॅलेंज'च्या पहिल्या टप्प्यातील अंतराळ विज्ञान ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेसाठी संपूर्ण भारतातून सुमारे ७,००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी चौथी ते बारावी इयत्तेतील होते. तरीदेखील या स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील पाच वर्षीय आयान पाटील याने सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याने ८६.६७ टक्के गुण मिळवून दुसऱ्या टप्प्यासाठी पात्रता मिळवत रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



राष्ट्रीय स्तरावरील 'इंडियन नॅशनल एरोस्पेस अँड कॅनसॅट चॅलेंज'च्या पहिल्या टप्प्यातील अंतराळ विज्ञान ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थी किमान चौथी इयत्तेत शिकणारा असावा, हा प्रमुख निकष होता. मात्र अंतराळ विज्ञान, रॉकेट सायन्स आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील आयानची लहान वयातील जिज्ञासा, त्याचे ज्ञान आणि आजवरची उल्लेखनीय वाटचाल पाहून निवड समितीने त्याला अवघ्या पाचव्या वर्षी ही परीक्षा देण्यासाठी विशेष पात्र ठरवले. या ऑलिम्पियाडमधील प्रश्न केवळ पुस्तकी ज्ञानावर आधारित नसून अंतराळ विज्ञानातील संकल्पनांची समज, तर्कशक्ती, निरीक्षणक्षमता आणि वेगवान निर्णयक्षमता तपासणारे होते. त्यातच परीक्षेसाठी अत्यंत मर्यादित वेळ असल्याने विद्यार्थ्यांसाठी हे मोठे आव्हान होते. मात्र, अंतराळ विज्ञान आणि रॉकेट सायन्समधील आयानच्या संकल्पना स्पष्ट असल्याने त्याला या आव्हानात्मक प्रश्नांची उत्तरे आत्मविश्वासाने देता आली. यावेळी त्याने उल्लेखनीय कामगिरी करत ८६.६७ टक्के गुण मिळवून पहिला टप्पा यशस्वीपणे पार केल्यानंतर आता आयानची निवड दुसऱ्या टप्प्यासाठी झाली आहे. प्रत्यक्ष प्रयोग, निर्मिती आणि अंतराळ-अभियांत्रिकीवर आधारित हा पुढील टप्पा बंगळुरू येथील विद्याशिल्प अकॅडमीमध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

# रुग्णालयातील गुंडगिरी

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटाच्या गुंडगिरीचे आणखी एक उदाहरण समोर आले आहे. पालघरमध्ये यांचे शहराचे व जिल्ह्याचे नेते एका इस्पितळात गेले व तिथे त्यांनी डॉक्टरांना मारहाण केली. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून शहरप्रमुखांना पार्टीतून काढून टाकल्याचे खुद्द शिंदे यांना जाहीर करावे लागले आहे. परवा दहीहंडी उत्सवात स्टेजवरून बायका नाचवण्याचे प्रकार यांच्याच पार्टीच्या नेत्यांनी केले व संपूर्ण महाराष्ट्राने ते पाहिले. त्याच उत्सवात जखमी झालेल्या काही गोविंदांना पालघरच्या रिलीफ इस्पितळात दाखल करण्यात आले होते. त्यांना इस्पितळातच का ठेवले आहे असे म्हणून शिंदे सेनेच्या गुंड कार्यकर्त्यांनी दंगा केला. याचे सीसीटीव्ही फुटेज आता सोशल मिडियातून सर्वत्र प्रसिद्ध झाले आहे. हे गोविंदा उंचावरून पडून त्यांच्या डोक्याला मार लागला होता. सध्याच्या वैद्यकीय पद्धतीनुसार अशा वेळी त्यांचा एमआरआय करणे व त्यांना चोवीस तास देखरेखीखाली ठेवणे आवश्यक असते. अनेकदा असा मार लागल्याचा परिणाम काही काळानंतर अचानक प्रकट होतो व मेंदूत रक्तस्त्राव वगैरे होऊन जिवाला धोका संभवतो. त्यामुळे डॉक्टर सावधगिरीचा उपाय म्हणून इस्पितळात ठेवण्याचा सल्ला देतात. जेणेकरून त्या काळात काही झाले तर रुग्णाला तात्काळ उपचार मिळू शकतात. मात्र आम्हाला काहीच झालेले नसताना डॉक्टर पैसे उकळण्यासाठी हे करीत आहेत असा अनेकांचा समज होतो. सेनेच्या लोकांनी हाच मुद्दा केला व त्यावरून इस्पितळाचे डॉक्टर, महिला कर्मचारी, नर्स इत्यादींना मारहाण केली किंवा अत्यंत असभ्य वर्तन केले. त्यानंतर हे सर्व लोक झुंडीने आयसीयूमध्ये घुसले व त्यांनी तेथील रुग्णाचे सलाईन काढायला लावून त्याला ते घेऊन गेले. डॉक्टरांनी इस्पितळात उपचाराचे भरमसाठ पैसे लावल्याची तक्रार हे सर्व लोक करीत होते. दहीहंडीसाठी लाखो रुपयांची पारितोषिके ठेवली जातात. डीजे वगैरेंवर असेच पैसे खर्च केले जातात. मात्र या सगळ्यातला मुख्य जो गोविंदा त्याच्या आरोग्यावर वा उपचारावर खर्च करण्याची वेळ आली यांना लगेच काटकसरीची आठवण होते. हा खर्च अनाठायी वाटू लागतो.

### सत्ता, पैसा यांचा माज

यापूर्वी जुलै महिन्यात याच शिंदे सेनेच्या रमेश म्हात्रे नावाच्या गुंड नगरसेवकाने डोंबिवलीतील महापालिकेच्या रुग्णालयात घुसून डॉक्टरांना मारहाण केली होती. त्याचे पडसाद देशभर उमटले होते. त्यावेळी एका गर्भवती महिलेवर त्याच ठिकाणी तात्काळ उपचार करावे असा तिच्या नातेवाईकांचा व म्हात्रे यांचा आग्रह होता. पण तिची स्थिती गंभीर असून तिला अधिक सुसज्ज रुग्णालयात हलवायला हवे असे डॉक्टरांनी सुचवले होते. त्यावरून थेट डॉक्टरांना व इतरांना मारहाण झाली. इंडियन मेडिकल असोसिएशनने याचा निषेध केला व सरकारी डॉक्टरांनी संपही केला. विशेष म्हणजे इतके होऊनही खालच्या न्यायालयाने या म्हात्रेला खुशाल जामीन दिला. त्याची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली व तो रद्द केला. नंतर काही काळाने जामीन मंजूर झाला, पण म्हात्रेने महाराष्ट्राच्या हद्दीत प्रवेश करता कामा नये अशी बंधने घालण्यात आली. त्याविरुद्ध म्हात्रे सर्वोच्च न्यायालयात गेला असून नेमके कालच या प्रकरणाची सुनावणी होती. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने पालघरमध्ये झालेल्या प्रकरणाचा दाखला दिला व हे सगळे लोक शिंदे यांच्या सेनेचेच आहेत असेही दाखवून दिले. म्हात्रे किंवा त्याच्यासारख्यांना रस्त्यावर मोकाट फिरू देता कामा नये अशा कडक शब्दात न्यायालयाने त्याची हजेरी घेतली. अखेर म्हात्रेच्या वकिलांना आपली याचिका मागे घ्यावी लागली. सर्वोच्च न्यायालयात म्हात्रेचे वकील होते मुकुल रोहटगी. दिल्लीतल्या अत्यंत महागड्या अशा पहिल्या पाच वकिलांमध्ये त्यांची गणना होते. म्हात्रेसारखा एका नगरपालिकेचा नगरसेवक अशा वकिलांची सेवा घेतो व पैसे मोजतो हे ध्यानात घेण्यासारखे आहे. उद्या पालघरमध्ये मारहाणीचा आरोप असलेल्या राहुल घरत यांची केसही तिथे गेली तर तेही बहुदा असेच कोणी वकील नेमतील. त्यांच्यावर पैसा घालवतील. पण इस्पितळातील डॉक्टरांनी पैसे जास्त घेतले किंवा पैशांसाठी रुग्णाला इस्पितळात ठेवून घेतले असा कांगावा करून मारहाणीवर उतरतील. पैसा आणि सत्ता यांचा हा माज आहे.

### टकमक टोकावर जायला हवे

या प्रकरणावर बराच ओरडा झाला. शिवाय सर्वोच्च न्यायालयानेही झडती घेतली. याच न्यायालयात सेनेच्या चिन्हाचे प्रकरण प्रलंबित आहे. ते ध्यानात घेऊन बहुदा एकनाथ शिंदे यांनी असे प्रकार चालणार नाहीत वगैरे भाषा केली आहे. पण हा केवळ रमेश म्हात्रे किंवा पालघरचे कोणी घरत इतक्यापुरताच मुद्दा सीमित नाही. महाराष्ट्रभरातून अशा तक्रारी सतत येत असतात. रायगड जिल्ह्यात यांचे आमदार व त्यांचे चेलेचपाटे यांचे वर्तन सर्वांसमोर आहे. त्यांच्याविरुद्धही अशीच काही प्रकरणे घडली आहेत. भरत गोगावले यांच्या मुलाचे प्रकरण काही दिवसांपूर्वी गाजले होते. इतर काही जणांना कनिष्ठ न्यायालयाने दोषीही ठरवल्याची उदाहरणे आहेत. सत्तेतून या बहुतेकांकडे अचानक प्रचंड पैसा आला आहे. शिवाय काहीही वाकडेतिकडे धंदे केले तरी वर एक फोन केला की पोलिस आणि प्रशासन गप्प राहते असा यांचा अनुभव आहे. यांचे आमदार संजय गायकवाड यांनी गेल्या वर्षी मुंबईतल्या आमदार निवासच्या कँटिन वेटरला मारहाण केली होती. अलिकडेच याच गायकवाड यांनी शिवाजी कोण होता या गोविंद पानसरेच्या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करून अत्यंत घाणेरड्या शिव्या दिल्या होत्या व मारहाणीची धमकी दिली होती. पण त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे मग इतर कार्यकर्त्यांचे धैर्य वाढते व डोंबिवली किंवा पालघरसारखे प्रकार घडतात. याच शिंदे सेनेच्या मराठवाड्यातील काही आमदार व खासदारांशी संबंधित लोकांची बेकायदा बांधकाम प्रकरणे चर्चेत आहेत. काही प्रकरणांमध्ये फडणवीसांनी चौकशीही सुरू केल्याच्या बातम्या मध्यंतरी आल्या होत्या. पण तोही बहुदा कारवाईची धमकी देऊन पुढे काहीच न करण्याचा प्रकार ठरला. शिंदे सेनेचे मंत्री दादा भुसे यांचे शाळा वा कॉलेज मान्यतेशी संबंधित अधिकार रद्द करून ते सनदी अधिकाऱ्यांना देण्याच निर्णय मुख्यमंत्र्यांनी अलिकडेच घेतला होता. भ्रष्टाचाराला चाप लावणे हा यामागचा हेतू होता अशी चर्चा आहे. तसे झाले असेल तर ते चांगले आहे. पण निव्वळ शिंदे सेनेला धाकात ठेवण्याचा राजकीय इरादा त्यामागे असेल तर कठीण आहे. शिवसेनेतून शिंदे यांनी घडवलेली फूट हाच मुळी अनैतिक व खोटारडेपणावर आधारलेला प्रकार होता. ज्या पार्टीची निर्मिती अशी झाली तिथे गायकवाड, म्हात्रे वा घरतसारखे गावगुंडांचाच भरणा असावा यात नवल नाही. इतके सगळे असून हे सर्वजण छत्रपती शिवाजीमहाराजांचे नाव सांगतात. आपण सामान्य माणसासाठी राज्य चालवतो असा दावा खुद्द शिंदे करतात. महाराज आज असते तर त्यांनी अशा लोकांचे काय केले असते हे टकमक टोकावर किंवा रांझे खुर्द इथे जाऊन विचारायला हवे.

## विचार

# पंजाबमधील नवी समीकरणे

**पंजाबमध्ये मतदारांनी पारंपारिक घराणेशाही नाकारून नवा पर्याय निवडला, तरी जनतेच्या अपेक्षांचे ओझे पेलणे सत्ताधाऱ्यांना कठीण ठरले आहे. बेरोजगारी, शेतीचे संकट, आर्थिक दिवाळखोरी आणि सुरक्षेची आव्हाने यांसारख्या मूलभूत मुद्द्यांवर ठोस आणि विश्वासार्ह उत्तर देणाऱ्या पक्षालाच पंजाबची जनता येत्या काळात कौल देईल. आगामी राजकीय घडामोडी पंजाबचीच नव्हे, तर देशाच्या सीमावर्ती राजकारणाची दिशा ठरवतील.**



राही भिडे

पाच नद्यांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंजाबचे राजकारण नेहमीच देशाच्या इतर भागांपेक्षा वेगळ्या धाटणीचे आणि स्वतःची स्वतंत्र ओळख जपणारे राहिले आहे. हरितक्रांतीचे अग्रदूत असलेले हे राज्य आज राजकीय, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या एका अत्यंत गुंतागुंतीच्या व संवेदनशील संक्रमण काळातून जात आहे. पारंपारिकपणे काँग्रेस आणि शिरोमणी अकाली दल यांच्यात फिरणारे पंजाबचे सत्ताकारण आता पूर्णपणे बहुकोनीय झाले असून, प्रत्येक राजकीय पक्षाला आपल्या अस्तित्वाची आणि प्रासंगिकतेची नव्याने लढाई लढावी लागत आहे. सत्ताधारी आम आदमी पक्ष (आप), अंतर्गत कलहाने ग्रासलेली काँग्रेस, अस्तित्व वाचवण्यासाठी धडपडणारा शिरोमणी अकाली दल आणि ग्रामीण पंजाबमध्ये मुसंडी मारू पाहणारा भारतीय जनता पक्ष अशा चार प्रमुख घटकांमध्ये सुरू असलेल्या राजकीय डावपेचांनी पंजाबचा आखाडा चांगलाच तापवला आहे. पंजाबमधील सत्तांतराला काही वर्षे उलटून गेल्यानंतर आता राज्यातील वस्तुस्थिती अधिक स्पष्टपणे समोर येत आहे. २०१७ पर्यंत अकाली दल-भाजप युती आणि काँग्रेस या दोन आघाड्यांभोवती फिरणाऱ्या राजकारणाला २०२२ मध्ये मतदारांनी पूर्णपणे छेद दिला. दिल्लीबाहेर पहिल्यांदाच आम आदमी पक्षाला मिळालेला प्रचंड जनादेश हा प्रस्थापित राजकीय व्यवस्थेविरुद्धचा तीव्र असंतोष होता; मात्र सत्तेचा कारभार चालवताना मुख्यमंत्र्यांना रोज नव्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

वस्तुत: मोफत वीज, मोहल्ला क्लिनिक, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा आणि प्रशासकीय पारदर्शकता या मुद्द्यांवर पक्षाने ग्रामीण तसेच निमशहरी भागात आपली पकड मजबूत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सामान्य कुटुंबातील पार्श्वभूमी असलेल्या मुख्यमंत्र्यांची लोकांशी थेट संवाद साधण्याची शैली पक्षासाठी मोठी जमेची बाजू ठरली आहे; परंतु केवळ लोकप्रिय घोषणांच्या बळावर पंजाबसारख्या सीमावर्ती आणि प्रचंड कर्जबाजारी राज्याचा गाडा हाकणे सोपे राहिलेले नाही. राज्यावरील वाढता कर्जाचा बोजा, भांडवली गुंतवणुकीची कमतरता आणि केंद्र सरकारसोबतचा वाढता संघर्ष यांमुळे प्रशासकीय पातळीवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. दुसरीकडे, पंजाबमधील सामाजिक आणि सुरक्षेचे प्रश्न अधिक टोकदार झाले आहेत. अंमली पदार्थांचे जाळे (ड्रग्ज), टोळीयुद्ध (गँगस्टर कल्चर) आणि वाढती गुन्हेगारी या समस्यांवर मात करण्याचे मोठे आव्हान सरकारसमोर उभे आहे. सीमापार असलेल्या घटकांकडून होणारी ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांची तस्करी पंजाबच्या तरूणाईला पोखरत आहे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून विरोधक वारंवार सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर पंथिक राजकारणातील अस्वस्थता, बंदी शिखांच्या सुटकेचा प्रश्न आणि कट्टरतावादी भावनांना खतपाणी घालणाऱ्या घटकांचा वावर यामुळे सामाजिक सलोखा टिकवून ठेवणे ही प्रशासनासाठी तारेवरची कसरत बनली आहे.

शेती हा पंजाबच्या अर्थव्यवस्थेचा आणि संस्कृतीचा कणा आहे. हमीभावाचा (एमएसपी) कायदेशीर हक्क, घटती भूजल पातळी, पराली (पिकांचे अवशेष) जाळण्याचा प्रश्न आणि शेतकरी संघटनांची वारंवार होणारी आंदोलने यामुळे पंजाबचे शेतकरी आजही रस्त्यावर आहेत. दिल्लीच्या सीमांवर झालेल्या ऐतिहासिक शेतकरी आंदोलनानंतर पंजाबमधील शेतकरी वर्गाची राजकीय जाणीव अधिक तीव्र झाली असून, कोणताही सत्ताधारी पक्ष त्यांना गृहीत धरू शकत नाही. या सर्व सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीवर पंजाबमधील राजकीय पक्षांमधील हालचालींना वेग आला आहे. मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसची अवस्था अंतर्गत कुरघोडींमुळे बिकट झाली आहे. राज्यात मजबूत जनाधार आणि संघटनात्मक ताकद असूनही नेत्यांमधील अहंकाराची लढाई काँग्रेसला सातत्याने मागे खेचत आहे. प्रदेशाध्यक्ष, विधिमंडळ पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री यांच्यातील मतभेद वारंवार चव्हाट्यावर येत आहेत. तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण करणारी ही गटबाजी पक्षाच्या पुनर्उभाऱ्यात मोठा अडथळा ठरत आहे. दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी पंजाबमधील गटबाजी संपवण्यासाठी अनेकदा हस्तक्षेप केला, तरीही स्थानिक नेत्यांमधील विसंवाद मिटलेला नाही. जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेण्याऐवजी पक्षाचे बडे नेते एकमेकांना पाण्यात पाहण्यातच अधिक ऊर्जा खर्च करताना दिसतात, ज्याचा थेट फायदा सत्ताधारी पक्षाला मिळतो. दरम्यान, पंजाबच्या राजकीय क्षितिजावर शिरोमणी अकाली दल आणि भाजप यांच्यातील संभाव्य जवळीक हा अत्यंत चर्चेचा विषय ठरला आहे.

तीन दशकांहून अधिक काळ चाललेली ही युती कृषी कायद्यांच्या विरोधात अकाली दलाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून बाहेर पडल्यानंतर संपुष्टात आली होती; मात्र एकट्याने लढताना दोन्ही पक्षांना पंजाबच्या मैदानात मर्यादा जाणवू लागल्या आहेत. अकाली दलाची पारंपरिक ताकद ग्रामीण भागातील जट शीख शेतकरी आणि पंथिक मतदारांमध्ये आहे, तर भाजपचा प्रभाव प्रामुख्याने शहरी हिंदू मतदारांमध्ये मर्यादित राहिला आहे. विभक्त झाल्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये दोन्ही पक्षांच्या मतांचे विभाजन झाले आणि त्याचा फटका दोघांनाही बसला. शिरोमणी अकाली दल सध्या आपल्या इतिहासातील सर्वात मोठ्या अस्तित्वाच्या संकटाला तोंड देत आहे. पक्षांतर्गत झालेली बंडखोरी, ज्येष्ठ नेत्यांची नाराजी आणि पंथिक मतदारांचा उडालेला विश्वास यामुळे बादल कुटुंबीयांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अकाल तख्त साहिबकडून झालेली धार्मिक कारवाई आणि पक्षातील फुटीर गटांचे आव्हान यामुळे सुखबीर सिंग बादल यांना आपली राजकीय रणनीती पूर्णपणे बदलावी लागत आहे. अशा परिस्थितीत, केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपशी जुळवून घेणे अकाली दलासाठी राजकीय संजीवनी ठरू शकते. दुसरीकडे, भाजपलाही पंजाबमध्ये केवळ शहरी भागापुरते मर्यादित न राहता संपूर्ण राज्यात विस्तार करायचा असल्यास एका प्रादेशिक आणि पंथिक चेहरा असलेल्या भागीदाराची नितांत गरज आहे; मात्र या युतीमध्ये अजूनही अनेक पेच कायम आहेत. जागावाटपाचे सूत्र, शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबतची भूमिका आणि केंद्र सरकारविषयी ग्रामीण पंजाबमधील रोष या मुद्द्यांवरून दोन्ही पक्षांना सावध पावले उचलावी लागत आहेत.

आगामी विधानसभेच्या रणधुमाळीकडे पाहता, पंजाबची राजकीय रचना अधिक रंगतदार आणि अनिर्णायक वळणावर पोहोचली आहे. आम आदमी पक्षासाठी आगामी काळ हा आपल्या कामगिरीची पावती मागण्याचा आणि दिल्ली मॉडेल पंजाबच्या मातीत यशस्वी झाल्याचे सिद्ध करण्याचा असेल. पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्था आणि पोटनिवडणुकांमध्ये आपला प्रभाव कायम राखण्याचा प्रयत्न केला असला, तरी सत्ताविरोधी लाट रोखणे हे सोपे आव्हान नसेल. विरोधक जर एकत्र आले किंवा मतांचे ध्रुवीकरण एका दिशेने झाले, तर सत्तेची लढाई अधिक चुरशीची होईल. काँग्रेससाठी ही लढाई पंजाबमधील आपले अस्तित्व टिकवून ठेवून पुन्हा सत्तेच्या शर्यतीत येण्याची आहे. जर पक्षाने अंतर्गत हेवेदावे बाजूला ठेवून एकसंध नेतृत्व दिले, तर ग्रामीण आणि दलित मतदारांच्या बळावर काँग्रेस आजही एक तगडा पर्याय ठरू शकते; मात्र त्यासाठी पक्षाला आपल्या रणनीतीत आमूलाग्र बदल करावा लागेल. दुसरीकडे, अकाली दल आणि भाजप यांच्यातील समीकरण कसे आकार घेते, यावरही संपूर्ण निवडणुकीचे गणित अवलंबून असेल. जर हे दोन्ही जुने मित्र एकत्र आले, तर ते पारंपारिक सामाजिक समीकरणांची (हिंदू-शीख ऐक्य) पुन्हा मांडणी करून सत्ताधाऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे करू शकतात. याशिवाय, पंथिक राजकारणातील कट्टर प्रवाह आणि अपक्ष घटकांची उपस्थिती मतांचे मोठे विभाजन घडवून आणू शकते. पंजाबच्या मतदाराला आता राजकीय नाट्यापेक्षा परिणाम हवा आहे.

२०२७ ची निवडणूक केवळ सत्ता कोणाच्या हातात जाणार याची लढाई नसेल; ती पंजाबच्या राजकारणाची पुढची दिशा ठरवणारी निर्णायक परीक्षा असेल. या परीक्षेत सर्व पक्षांना आपल्या जुन्या चुका, गटबाजी आणि घोषणांच्या राजकारणापलीकडे जावे लागेल. अन्यथा, पंजाबचा मतदार पुन्हा एकदा प्रस्थापित राजकारणाला धक्का देण्यास मागेपुढे पाहणार नाही.

## चर्चा आजची

# गणेशोत्सवावर महागाईचे सावट



वैभव पाटील

गणेशोत्सव जवळ येताच मूर्तीकारांच्या कार्यशाळा सध्या चैतन्याने फुलून गेल्या आहेत. अंतिम रंगरंगोटी, डोळ्यांना जीवंतपणा देणारी कलाकुसर, मुकुट आणि आकर्षक सजावटीमुळे प्रत्येक गणरायाची मूर्ती अधिक देखणी बनत आहे. ग्राहकांच्या पसंतीनुसार विविध आकार, रंगसंगती आणि पारंपरिक तसेच आधुनिक संकल्पनांवर आधारित मूर्ती तयार करण्यात येत आहेत. त्यामुळे मूर्तीकार दिवस-रात्र मेहनत घेत असल्याचे चित्र सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे. गणपती बाप्पाच्या आगमनाकडे भक्तांचे लक्ष लागले असून स्वागताची जय्यत तयारी सुरू झाली आहे.

गणेशोत्सवासाठी अनेक भाविकांनी आतापासूनच आपल्या आवडीच्या गणरायाची मूर्ती आकर्षित केली आहे. मात्र, मागील वर्षाच्या तुलनेत यंदा मूर्तींच्या किमतीत वाढ झाल्याचे ग्राहकही सांगत आहेत. यामागे रंग, शाडू माती, पीओपी, फायबर, सजावटीचे साहित्य, पॅकिंग आणि वाहतूक खर्चात झालेली वाढ हे प्रमुख कारण असल्याचे मूर्ती विक्रेत्यांचे म्हणणे आहे. वाढत्या खर्चामुळे मूर्तींचे दर वाढले असले तरी गणरायावरील भक्ती आणि उत्साह मात्र तसाच कायम असल्याचे चित्र आहे.

दरवाढीचे आव्हान असले तरी मूर्तीकारांकडून गुणवत्तेवर कोणतीही तडजोड केली जात नाही. प्रत्येक मूर्ती अधिक आकर्षक, सुबक आणि भक्तांच्या अपेक्षेनुसार तयार करण्यासाठी कारागीर अहोरात्र मेहनत घेत आहेत. आता काही दिवसांतच या देखण्या गणेशमूर्ती राज्यभरातील भाविकांच्या घरी विराजमान होणार असून, गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचणार आहे. यावर्षी गणेशमूर्तीपासून सर्वच साहित्याचे दर वाढल्याने यावर्षी गणेशोत्सवावर महागाईचे सावट दिसून येत आहे. गणपती सण म्हटला, की प्रत्येक घरामध्ये चैतन्याचे वातावरण पसरते. प्रत्येक घरात आधी पंधरा दिवसांपासून या सणाची तयारी सुरू होते. गणरायाच्या स्वागतासाठी कोकणवासीय सज्ज झाले आहेत. बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात पूजेसाठी व सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तू व अन्य गोष्टी दाखल होतात. दुकानांमध्ये टांगलेल्या पावसाळी वस्तू बाजूला होऊन त्याजागी गणपती सणात आवश्यक असलेल्या वस्तू आपली जागा घेतात. कोरोना काळापासून मंदावलेली उलाढाल यावर्षी तरी पुन्हा जोमाने होईल, अशी आशा व्यावसायिकांना असतानाच पुन्हा एकदा महागाईने डोके वर काढले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी पुन्हा वस्तूंचे दर वाढल्याने नेहमी गजबजलेल्या असलेल्या बाजारपेठेत शुकशुकाट दिसून येत आहे. गणेश मूर्तीपासून ते सजावटीचे साहित्य, इलेक्ट्रॉनिक वस्तू, रंग, फटाके, मिठाई व अन्य वस्तूंच्या किंमतीमध्ये कमालीची वाढ पाहायला मिळत आहे.

पेट्रोल, डिझेल चढतीवर असल्याने जास्तीचा वाहतूक खर्चदेखील सहन करावा लागणार आहे. मूर्तीपुढे सजावट करणाऱ्या मंडळांना सजावटीच्या सर्वच वस्तू महागल्याने बजेटमध्ये कपात करावी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. यंदाचा गणेशोत्सव पूर्वीइतका झगमगाट राहणार नसल्याचे दिसत आहे. महागाईमुळे सामान्य कुटुंबाची आर्थिक स्थिती कोलमडली आहे. त्यामुळे दारोदारी फिरून गोळा होणारी वर्गणीदेखील यावर्षी अपेक्षेप्रमाणे राहणार नसल्याचेच चित्र आहे. बडे वर्गणीदारही गतवर्षीच्या तुलनेत यंदा फारसा खर्च करण्याच्या स्थितीत नाहीत. पाऊस नसल्यामुळे व्यवसायात मंदी आल्याची उत्तरे देऊन गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बोळवण केली जात आहे. याचा मोठा फटका डेकोरेशनचे काम करणाऱ्यांना बसण्याची चिन्हे आहेत.

सार्वजनिक गणपती मंडळांकडूनही गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरू आहे. सावंतवाडी शहरात सात ठिकाणी सार्वजनिक गणपतींचे पूजन केले जाते. प्रत्येक गणेश मंडळाकडून दरवर्षी धुमधडाक्यात आपल्या गणपतीची सेवा केली जाते. सद्यस्थितीत मंडळांचे कार्यकर्ते बाप्पांच्या आगमनाची उत्सुकतेने वाट पाहत आहेत. त्यासाठी आवश्यक असलेली सर्व व्यवस्था मंडळांकडून करण्यात आली आहे. प्रत्येक सार्वजनिक गणपती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना पोलीस प्रशासनाकडून योग्य त्या सूचना दिल्या आहेत. उत्सवात धार्मिक भावना दुखवण्यासारखे कोणतेही प्रकार घडू नयेत, भाविकांना दर्शनासाठी सुलभ अशी व्यवस्था करण्याबाबत मार्गदर्शन केले आहे. काही मंडळांकडून हालत्या देखाव्यांसाठी खर्च केला जातो. शहरातील चितारआळी गणेशोत्सव मंडळाकडून दरवर्षी हालता देखावा गणेशभक्तांना उपलब्ध करून दिला जातो. यावर्षीही मंडळाकडून यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. गणेशमूर्ती शाळांमध्येही लगबग दिसून येत आहे. अवघ्या दोन दिवसांवर आलेल्या सणामुळे मूर्ती परिपूर्ण करण्यावर मूर्तिकारांनी भर दिला आहे. तालुक्यात मातीसह आता प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तीही मोठ्या प्रमाणात चित्रशाळांमध्ये दिसून येत आहेत. आकर्षक अशा या गणेशमूर्तींना मोठी मागणी असल्याचे मूर्तिकारांचे म्हणणे आहे. मात्र पर्यावरणप्रेमींच्या मते या मूर्ती पर्यावरणासाठी हानिकारक आहेत. गणेशभक्तांची मागणी आणि व्यवसाय पाहता ग्राहकांच्या पसंतीनुसार प्राधान्य देत असून, यावर्षी रंग, मजुरीमध्ये वाढ झाल्याने गणेशमूर्तींच्या दरात वाढ झाल्याचे मूर्तिकारांकडून सांगण्यात येत आहे.

## लोकसंसद

### 'पॅसिव्ह स्मोकिंग'चे निष्पाप बळी!

जागतिक पातळीवरील 'द लॅन्सेट' या वैद्यकीय नियतकालिकाच्या कार्यप्रणालीचा एक भाग असलेल्या 'द लॅन्सेट पब्लिक हेल्थ' या वैद्यकीय तज्ज्ञ समीक्षित अग्रगण्य वैद्यकीय नियतकालिकात नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार भारतात 'पॅसिव्ह स्मोकिंग' मुळे (निष्क्रिय धूम्रपान-इतरांच्या धूम्रपानाचा धूर शरीरात जाणे) मृत्यूंचे प्रमाण प्रचंड वाढले असून १९९० पासून यात जवळपास ५० टक्के वाढ झाली आहे. केवळ २०२३ मध्येच ३,२५,६०० लोकांना यामुळे आपला जीव गमवावा लागला. या विषारी धुराच्या संपर्कात आलेल्या लोकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन अशा बाधित लोकांची प्रत्यक्ष संख्या १९९० मधील ३७ कोटी ५० लाखांवरून २०२३ मध्ये ४४ कोटी ४० लाखांपर्यंत वाढली आणि मृत्यूंची संख्या २,१७,७०० वरून ३,२५,६०० पर्यंत पोहोचली. २०२३ मध्ये जागतिक स्तरावर २.७१ अब्ज लोक या अप्रत्यक्ष धूम्रपानाच्या संपर्कात आले. त्यापैकी जवळपास अर्धी लोकसंख्या चीन, भारत आणि इंडोनेशिया या तीन देशांमध्ये होती. खरे तर आपल्या देशात सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानावर बंदीचे नियम असूनही त्यांची अंमलबजावणी कठोरपणे होताना दिसत नाही. हॉटेल, बस स्थानके, रेल्वे स्थानके किंवा रस्त्यांवर आजही सर्रास धूम्रपान केले जाते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सिगारेट, बीडी, हुक्का व तत्सम पदार्थ ओढणाऱ्या व्यसनाधीन लोकांनी हवेत सोडलेल्या विषारी धुराचे श्वसन केल्यामुळे धुम्रपान न करणाऱ्या लोकांनाही अनेक रोगांना नाहक बळी पडावे लागत आहे. या संदर्भात कायद्याच्या अंमलबजावणी सोबतच या गंभीर समस्येवर समाजात व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे. **-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# एक भारतीय स्वातंत्र्यसैनिक - शिरीषकुमार

शिरीषकुमार यांचा आज स्मृतिदिन. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेकांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीच स्वातंत्र्यलढ्यात हिरीरीने भाग घेतला होता. १८५७ च्या उठावापासून ते स्वातंत्र्यापर्यंत अनेकांनी भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी अनेक आंदोलनं, चळवळी उभ्या केल्या. या आंदोलन, चळवळींना तत्कालीन जनतेने मोठा पाठिंबा दिला. महिला, पुरूष क्रांतिकारकांबरोबरच शाळकरी मुलांनीही भारताच्या स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान दिले आहे. अशाच एका बाल क्रांतिकारकाने भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती दिली. त्यांचे नाव शिरीषकुमार.

महाराष्ट्रातील नंदूरबारचे ते सुपूत्र होते. त्यांचा जन्म २८ डिसेंबर १९२६ रोजी पुष्पेंद्र मेहता आणि सविता मेहता या दाम्पत्याच्या घरी शिरीषकुमार यांचा जन्म झाला. शिरीषकुमार यांचे आई-वडील दोघेही भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी होते. त्यांची आई सविताबेन ह्या राष्ट्र सेवा दल या स्थानिक संघटनेच्या अध्यक्षा होत्या. तर वडील पुष्पेंद्रभाई नंदूरबारमधील काँग्रेस कमिटीचे नेते होते. त्यामुळे देशप्रेमाचे वातावरण असलेल्या घरात शिरीषकुमार लहानाचे मोठे होत होते.

शिरीषकुमार यांना अरविंद, प्रफुल्ल आणि बकूळ हे तीन भाऊ तसेच शशिकला, सुवर्णा, मीरा आणि उषाबेन या चार बहिणी होत्या. शिरीषकुमार हे स्वयंपाकशास्त्रात निपुण होते. असेच एके दिवशी शिरीषकुमार चवदार पुऱ्या बनवत होते. पुऱ्या करत असताना अचानक कढईतील गरम तेल त्यांच्या पायावर पडले. पण शिरीषकुमार मात्र शांत होते. याबाबत त्यांच्या मित्राने त्यांना जखमेच्या वेदनेबाबत विचारपूस केली. तेव्हा त्यांनी मित्राला दिलेल्या उत्तरातून संवेदनशील आणि विचारशील शिरीषकुमारचे दर्शन घडले. ते मित्राला म्हणाले की, मला झालेल्या वेदनांपेक्षा ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीत भारतमातेला होणाऱ्या वेदना अधिक क्लेशदायक असल्याचे मत त्यांनी मांडले होते. एके दिवशी शिरीषकुमार यांचे वडील पुष्पेंद्र मेहता यांना काही कामानिमित्त मुंबईला जावे लागले होते. साहजिकच मुंबईहून परतताना त्यांनी कुटुंबियांना कोणत्या भेटवस्तू पाहिजेत म्हणून विचारणा केली. त्यावेळी शाळेत जाणाऱ्या शिरीषकुमारने वडिलांना महात्मा गांधीजींच्या प्रवचनांचे ऑडिओ रेकॉर्ड्स आणण्यास सांगितले. त्यानुसार पुष्पेंद्र मेहता यांनी ऑडिओ रेकॉर्ड्स आणले. त्यांनी पुढील अनेक दिवस गांधीजींच्या प्रवचनांचे ते रेकॉर्ड्स ऐकले. त्यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला.

महात्मा गांधींनी ९ ऑगस्ट १९४२ ला इंग्रजांना 'चले जाव'चा आदेश दिला. त्यानंतर गावोगावी प्रभात फेऱ्या, ब्रिटिशांना इशारे दिले जाऊ लागले. बरोबर महिनाभरानंतर, ९ सप्टेंबर १९४२ ला नंदुरबारमध्ये निघालेल्या प्रभात फेरीत आठवीत शिकत असलेला शिरीष सहभागी झाला होता. गुजराथी मातृभाषा असलेल्या शिरीषने प्रभात फेरीत घोषणा सुरू केल्या, 'नहीं नमशे, नहीं नमशे,' 'निशाण भूमी भारतनु'. भारत मातेचा जयघोष करीत ही फेरी गावातून फिरत होती. मध्यवर्ती ठिकाणी ती फेरी पोलिसांनी अडवली. शिरीषकुमारच्या हातात झेंडा होता. पोलिसांनी ही मिरवणूक विसर्जित करण्याचे आवाहन केले. या बालकांनी ते आवाहन झुगारले आणि 'भारत माता की जय,' 'वंदे मातरम्'चा जयघोष सुरूच ठेवला. अखेर पोलिसांनी गोळीबार सुरू केला. एका पोलीस अधिकाऱ्याने मिरवणुकीत सहभागी मुलींच्या दिशेने बंदूक रोखली. तेव्हा त्या अधिकाऱ्याला एका चुणचुणीत मुलाने सुनावले, 'गोळी मारायची तर मला मार!'. ती वीरश्री संचारलेला मुलगा होता, शिरीषकुमार मेहता! संतापलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या बंदुकीतून सुटलेल्या, एक, दोन, तीन गोळ्या शिरीषच्या छातीत बसल्या आणि तो जागीच कोसळला. त्याच्यासोबत पोलिसांच्या गोळीबारात लालदास शहा, धनसुखलाल वाणी, शशिधर केतकर, घनश्यामदास शहा हे अन्य चौघेही शहीद झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**९ सप्टेंबर**

१) श्रीम.सुमती गणेश आठवले कामतआळी,अलिबाग, दि.९-९-१९४२

२) श्री.अनंत दिनकर जोशी मारूती चेंढरे-अलिबाग, दि.९-९-१९५०

३)श्रीम.स्मिता दिलीप प्रधान पिंपळभाट, अलिबाग दि.९-९-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**



**माही दिपक नागांवकर, वाढदिवस, अलिबाग**

## वंदना कडव यांचे निधन



**खांब :** रोहा तालुक्यातील वांदोळी गावच्या रहिवासी वंदना मारूती कडव यांचे गुरूवारी (दि.३) वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींसह त्यांचे आप्तस्वकीय व मित्र परिवार यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे व मोठा भक्ती परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शनिवर दि.१२ सप्टेंबर तर अंतिम धार्मिकविधी रविवार दि.१३ सप्टेंबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांकडून देण्यात आली.

# फूटपाथांची अवस्था भयानक

## • तुटलेल्या लाद्या, खड्डे यामुळे नागरिक त्रस्त

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

खांदा वसाहतीतील अनेक सेक्टरमधील फूटपाथांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच भयानक होत असून, नागरिकांसाठी चालणे म्हणजे अक्षरशः जीव मुठीत घेऊन वाट काढण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. तुटलेल्या लाद्या, उखडलेले फूटपाथ आणि ठिकठिकाणी पडलेले खड्डे यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या फूटपाथवरून वाट काढताना अनेक महिला व नागरिक पडल्याच्या घटनाही घडल्या असून, एखादा गंभीर अपघात झाल्यानंतरच पालिका प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, ही परिस्थिती काही दिवसांची नसून अनेक वर्षांपासून कायम आहे. पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी वेळोवेळी पाहणीसाठी येतात. फूटपाथच्या विविध कोनांतून



दहा-बारा फोटो काढले जातात, अधिकाऱ्यांमध्ये चर्चा होते आणि त्यानंतर मात्र पुढे काय, असा प्रश्न नागरिकांना पडतो.

पाहणी आणि फोटोग्राफीच्या पलीकडे प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होणार, याची प्रतीक्षा खांदा वसाहतीतील नागरिक करीत आहेत. दरम्यान, या रस्त्यावर काम करणारे स्वच्छता दूत आणि स्वच्छता निरीक्षक अपघात होऊ नये म्हणून धोकादायक ठिकाणी काही ना काही वस्तू ठेवून नागरिकांना सावध करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र ही तात्पुरती व्यवस्था असून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची जबाबदारी महानगरपालिकेचीच आहे.

पालिका प्रशासनाने सेक्टर १३ आणि सेक्टर १ मधील काही फूटपाथवर नवीन लाद्या बसविल्या आहेत. मात्र इतर सेक्टरमधील फूटपाथांकडे दुर्लक्ष का, असा

### केवळ पाहणी नको, प्रत्यक्ष काम हवे

पालिका प्रशासनाने वरवरची मलमपट्टी न करता खांदा वसाहतीतील सर्व सेक्टरमधील धोकादायक फूटपाथांची तातडीने पाहणी करून एकत्रित दुरुस्ती मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. सर्व फूटपाथ कधी सुस्थितीत होणार आणि नागरिकांना सुरक्षितपणे चालण्याचा हक्क कधी मिळणार? आता केवळ पाहणी नको, तर प्रत्यक्ष काम हवे, अशी खणखणीत मागणी खांदा वसाहतकरांनी केली आहे.

सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. खांदा वसाहतीतील अनेक शाळकरी मुले दररोज याच धोकादायक फूटपाथवरून शाळेत ये-जा करतात. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिक बिकट बनते.

खांदा वसाहतीतील नागरिक नियमितपणे कर भरत असताना विकासकामांमध्ये सर्व सेक्टरना समान न्याय का मिळत नाही, अशी नाराजीही व्यक्त होत आहे.

काही मोजक्या सेक्टरवरच पालिका प्रशासनाचे विशेष प्रेम उफाळून येत असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. खांदा वसाहतीत प्रवेश करताना मुख्य रस्त्यावरील फूटपाथ चकचकीत दिसतात; मात्र आतील भागातील फूटपाथांची अवस्था मात्र दुर्लक्षितच असल्याचे चित्र आहे.

'फोटो काढून पाहणी संपते, पण काम कधी सुरू होणार?' हा आता खांदा वसाहतीतील नागरिकांचा प्रमुख प्रश्न बनला आहे.



## पनवेलमध्ये पोलिसांचा रूट मार्च

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

**■ आगामी सणांच्या काळात शांतता, सलोखा राखण्याचे आवाहन**

आगामी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच इतर सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, यासाठी पनवेल शहर पोलिसांनी सोमवारी सायंकाळी शहरात 'एरिया डॉमिनेशन' अंतर्गत रूट मार्च काढला.

हा रूट मार्च ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४.३० ते ६ वाजेदरम्यान पनवेल शहर पोलीस ठाण्यापासून सुरू करण्यात आला. ५२ बंगला, साईनगर, ख्वाजा नगरी मशीद, साई श्रद्धा मित्र मंडळ, बंदर रोड, ओंकारेश्वर महादेव मंदिर, आयशा मशीद, आदिल टॉवर, सुफा मशीद, एमजी रोड, कच्ची मोहल्ला, मुसलमान नाका, पाडा मोहल्ला मशीद, जलाल शाह दर्गा, पनवेल महानगरपालिका कार्यालय, जय भारत नाका, लाईन आळी आणि वीरुपक्ष मंदिर परिसरातून हा मार्च काढण्यात आला.

आदर्श हॉटेलमार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रूट मार्चची सांगता करण्यात आली. विविध धार्मिक स्थळे, बाजारपेठा आणि संवेदनशील परिसरातून पोलिसांनी संचलन करत नागरिकांना शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन केले. या रूट मार्चमध्ये पनवेल शहर पोलीस ठाण्यातील सात अधिकारी व ३५ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. तसेच बी-१०२चे उपकमांडर, सहाय्यक कमांडर, पाच निरीक्षक, आठ उपनिरीक्षक आणि १०१ अंमलदारांचा सहभाग होता.

पनवेल शहर पोलिसांची दोन व ची तीन वाहने या संचलनात सहभागी झाली होती. आगामी सणांच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याकडून विशेष खबरदारी घेतली जात असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी दिली.

# पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

## • सेवा देण्यातच समाधान असते: विलास चौलकर

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

जुलै महिन्यात नागोठणे परिसरात आलेल्या पूरामुळे अनेक नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या पूरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने लायन्स क्लबच्या वतीने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येत आले. नागोठणे लायन्स क्लब ही सेवा देणारी संस्था असून, समाजातील गरजू नागरिकांना सेवा देण्यातच आम्हा सर्व लायन्स सदस्यांना समाधान मिळते, असे प्रतिपादन नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन विलास चौलकर यांनी केले.




नागोठणे येथील स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यान येथे सोमवारी (दि.७) हा मदत वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पूरग्रस्त नागरिकांना तूरडाळ १ किलो, मुगडाळ १ किलो, तेल १ किलो, साखर १ किलो, तांदूळ ५ किलो, बिस्कीट पाकीट, ४ ताटे, ४ वाट्या, २ भाजीचे मोठे चमचे, १ सतरंजी व १ चादर अशा जीवनावश्यक वस्तूंचे वाटप इंटरनॅशनल लायन्स क्लब फाउंडेशन कडून नागोठणे लायन्स क्लबच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच, लायन्स क्लब सरगम पनवेल यांच्या वतीने महिलांना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास लायन्स क्लबचे सर्व सदस्य तसेच पूरग्रस्त नागरिक उपस्थित होते.

## तळ्यात शांतता समितीची बैठक

**तळा :** गणेशोत्सव सण शांततेत व उत्साहात पार पडावा, यासाठी तळा पोलीस ठाण्याच्या वतीने शांतता समितीची बैठक सोमवारी (दि.७) तळा येथील कुणबी सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे यांनी गणेश मंडळांना सूचना दिल्या. डीजे, वाहतूक, मिरवणूक मार्ग व कायदा-सुव्यवस्था राखण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडत असेल तर त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन केले.

## अनंता हिरवे पुरस्काराने सन्मानित

**| खोपोली | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे जिल्हाध्यक्ष अनंता हिरवे यांना बी दि चेंज फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शिर्डी येथे मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

खालापूर तालुक्यातील गारमाळ (वावोशी) येथील हिरवे यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून सुमारे २५ वर्षांपूर्वी धनगर समाजाला संघटित करण्यासाठी संस्थेची स्थापना केली. समाजाच्या हक्कांसाठी आवाज उठविण्यासह गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आणि विविध समाजोपयोगी उपक्रम ते सातत्याने राबवत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत हा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला. पुरस्कारामुळे धनगर समाजात आनंदाचे वातावरण असून विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार माझा एकट्याचा गौरव नसून संपूर्ण समाजाचा सन्मान आहे. सहकाऱ्यांच्या योगदानामुळे हा सन्मान मिळाला असून यापुढे आणखी चांगले काम करण्याची ऊर्जा मिळाली आहे, अशी प्रतिक्रिया अनंता हिरवे यांनी यावेळी दिली.

# अजय मोकल यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

नवी मुंबई (उलवे) येथील सी पी गोइंका इंटरनॅशनल स्कूलचे कला शिक्षक अजय दामोदर मोकल यांना नवी मुंबई आणि रायगड विद्यालय सर्वधनम २०२६ चा शैक्षणिक क्षेत्रातील चित्रकलेतील विशेष योगदानाबद्दल प्रतिष्ठित व मानाचा समजला जाणारा सर्वोत्कृष्ट आदर्श शिक्षक पुरस्कार, शिक्षक दिनाचे औचित्य साधून देण्यात आला.

एच आर संयुक्ता सिन्हा यांच्या हस्ते कला शिक्षक मोकल यांना हा पुरस्कार



समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. शाळेच्या प्राचार्या डॉ. स्मिता गांधी यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व चिरनेर ग्रामस्थांनी मोकल यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# दापोलीत तीन दिवसीय कृषी संशोधन

**■ ३०० शास्त्रज्ञ होणार सहभागी**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ५४व्या संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समितीची बैठक दि.९ ते ११ सप्टेंबर या कालावधीत विद्यापीठाच्या सर विश्वेश्वरय्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली आहे.

बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, गृह, शहरे, महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, नागरी सुरक्षा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम, वित्त नियोजन, कृषी, मदत व पुर्नवसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल, रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिल तटकरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे उपाध्यक्ष तुषार पवार, कृषी सचिव परिमल सिंग, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे महासंचालक राहुल महिवाल, कृषी आयुक्त सुरज मांढरे तसेच चारही विद्यापीठाचे कुलगुरू आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून यजमान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे हे राहणार आहेत.

तीन दिवस चालणाऱ्या या बैठकीत चारही कृषी विद्यापीठामध्ये गतवर्षात झालेल्या संशोधनावर चर्चा होणार आहे. यात चारही कृषी विद्यापीठातील ३००हून अधिक शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत.

बैठकीमध्ये शेतकरी, कृषी विभाग, दुग्धशास्त्र विभाग, हवामान विभाग इत्यादीसाठी महत्त्वपूर्ण संशोधनपर शिफारशीदेखील सादर करण्यातयेणारआहेत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाच्या वतीने प्रसारणाकरीता यंत्र अवजारे १, विविध पिंकातील तंत्रज्ञान शिफारशी ३६ आणि पूर्व प्रसारणाकरीता एका वाणाची शिफारस करण्यासाठी बैठकीमध्ये ठेवण्यात येणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे प्रस्तावित वाण १०, प्रसारणाकरीता यंत्रे अवजारे १६, पीक तंत्रज्ञान शिफारशी ८६, पूर्व प्रसारणाकरीता वाण ०६, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचे प्रस्तावित वाण ११, प्रसारणाकरीता यंत्रे अवजारे ०५, पीक तंत्रज्ञान शिफारशी ८६, पूर्व प्रसारणाकरीता वाण ०९ आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांचे प्रस्तावित वाण ०५, प्रसारणाकरीता यंत्रे अवजारे ०४ , पीक तंत्रज्ञाना संबंधी ४२ शिफारशी या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात येणार आहेत.

**शाडूच्या पर्यावरणपूरक बाप्पांना दिल्लीकरांची पसंती | महाराष्ट्र एम्पोरियममध्ये गणेशमूर्तींची मोहिनी**

# राजधानीत घुमला पेणच्या कलेचा डंका

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

देशभरात गणेशमूर्तींचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या रायगड जिल्ह्यातील पेणच्या गणेशमूर्तींनी आता देशाची राजधानी दिल्लीही जिंकली आहे. नवी दिल्ली येथील महाराष्ट्र एम्पोरियममध्ये आयोजित विशेष प्रदर्शन व विक्री उपक्रमात पेणच्या शाडूमातीच्या देखण्या गणेशमूर्तींना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

महाराष्ट्राच्या पारंपरिक कलेचा डंका राजधानीत घुमत आहे. गणेशमूर्ती निर्मितीची शेकडो वर्षांची परंपरा जपणाऱ्या पेणच्या कारागिरांनी घडविलेल्या मूर्ती त्यांच्या जिवंत भासणाऱ्या डोळ्यांमुळे आणि बारकाईच्या कलाकुसरीमुळे देशभर





प्रसिद्ध आहेत. याच वैशिष्ट्यांची झलक दिल्लीतील प्रदर्शनात पाहायला मिळत आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक आणि पर्यटक एम्पोरियममध्ये भेट देत आहेत. या प्रदर्शनात सुमारे १,२०० गणेशमूर्तींचे प्रदर्शन करण्यात आले असून, पर्यावरणपूरक शाडूमातीच्या मूर्तींना विशेष मागणी आहे.

महाराष्ट्राची संस्कृती, कोकणची कलासंपदा आणि पेणच्या कारागिरांचे अद्वितीय कौशल्य यांचा संगम असलेल्या या प्रदर्शनामुळे 'ब्रँड पेण'ला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. राजधानीत घुमलेला हा डंका भविष्यात पेणच्या गणेशमूर्तींना आणखी मोठ्या बाजारपेठा उपलब्ध करून देईल, असा विश्वास स्थानिक कारागिरांकडून व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे या यशामागे पेणमधील महिला कारागिरांचा मोठा वाटा आहे. ग्रामीण भागातील महिला बचत गटांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवत स्थानिक कलेला राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून दिले आहे.

### अर्थव्यवस्थेला चालना

पेणमधील गणेशमूर्ती उद्योग हा हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार बनला आहे. मूर्तिकार, रंगकाम करणारे कारागीर, सजावट साहित्य उत्पादक, वाहतूक व्यवसायिक आणि विक्रेते अशा अनेक घटकांना या उद्योगातून रोजगार मिळतो. त्यामुळे दिल्लीतील प्रदर्शनातून मिळणारा प्रतिसाद हा केवळ कलेचा गौरव नसून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारा ठरत आहे.

# निवडक

## विशेष वर्षावास कार्यक्रम उत्साहात



**नवी मुंबई :** बौद्धजन विकास संघ आणि बौद्धजन महिला विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.६) सेक्टर ४८, सीवूड्स येथील लुम्बिनी बुद्ध विहार येथे मुलांसाठी आयोजित करण्यात आलेला विशेष वर्षावास कार्यक्रम उत्साहात पार पडला. सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांत चालणाऱ्या या विशेष संस्कारक्षम उपक्रमाच्या पहिल्या दिवशी नियोजित केलेल्या सर्व उपक्रमांची अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करण्यात आली. या पहिल्या सत्रात मुलांना ध्यान साधना, बुद्ध वंदना, व्यक्तिमत्त्व विकास, महापुरुषांचा परिचय, पाली भाषा आणि योगाभ्यास याचे अभ्यासपूर्ण धडे देण्यात आले. अनेक पालकांनी याप्रसंगी मुलांसाठी स्वेच्छेने फलहार दान करून उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. येत्या ऑक्टोबर महिन्यापर्यंत दर रविवारी सकाळी ११ ते १२ या वेळेत हा उपक्रम लुम्बिनी बुद्ध विहारात असाच सुरू राहणार आहे. तरी परिसरातील अधिकाधिक पालकांनी आपल्या मुलांना या संस्कार वर्गात पाठवावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.



## कृतज्ञता सोहळ्याचे यशस्वी आयोजन

**चिरनेर :** चिरनेर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत शिक्षक दिनाचे औचित्य साधून, शाळा व्यवस्थापन समिती, पालक व विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सोमवारी (दि.७) कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आरंभी शाळा व्यवस्थापन समितीच्या महिला सदस्यांनी व विद्यार्थिनींनी मुख्याध्यापक बळीराम पाटील यांच्यासह उपशिक्षक निर्भय म्हात्रे, रोशन थळी, शिवप्रसाद पंडित, पुष्पलता म्हात्रे व निता नवाळे या सर्वांचे औक्षण व सन्मान करून, गुरूंचे संस्कार व आठवणी जाग्या केल्या. यावेळी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसह पालकांनी देखील मनोगतातून आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांबद्दलच्या भावना व्यक्त करताना शिक्षकांचे मार्गदर्शन, प्रेम आणि संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शिक्षकांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत, विद्यार्थ्यांनी व पालकांनी आयोजित केलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने तयार केलेली शुभेच्छापत्रे, गुलाबपुष्पे व भेटवस्तू आपल्या वर्गशिक्षकांना देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.



## सर्पमित्रांकडून नागाला जीवनदान

**खरोशी :** पेण तालुक्यातील काळेश्री गावातील शशिकांत म्हात्रे (गुरुजी) यांच्या घरात माळ्यावर नाग सापडला. दुपारच्या सुमारास माळ्यावर काहीतरी मोठमोठ्याने आपटल्यासारखा आवाज येत असल्याने शशिकांत म्हात्रे व त्याची पत्नी सविता म्हात्रे हे माळ्यावर पाहण्यासाठी गेले. दरवाजा उघडताच त्यांच्या असे लक्षात आले की, समोर सापाने उंदराला पकडले आहे. घाबरलेल्या अवस्थेत खाली आले आणि गावातील पोलीस पाटील ज्योती पाटील व विशाखा पाटील यांच्याकडे जाऊन माहिती सांगितली. त्यांच्याकडून सर्पमित्रांचा नंबर घेऊन त्यांना फोन केला. तात्काळ सर्पमित्र करण सोनावणे वाशी-(बौद्धवाडा) व त्यांचे सहकारी ऋतिक मोकल (मोठे वढाव) व रोशन म्हात्रे (वाशी) या तिघांनीही कोणत्याही प्रकारचा विलंब न करता ते काळेश्रीला आले. काही वेळातच सापाला पकडण्यात ते यशस्वी झाले. सापाला पकडल्यानंतर तो नाग या प्रजातीचा असल्याचे लक्षात आले. त्यांनी त्या नागाला पकडून एका मोठ्या बरणीत भरले आणि निसर्गाच्या सानिध्यात सोडून त्याला जीवनदान दिले. सर्पमित्रांनी केलेल्या चांगल्या कामाचे कौतुक होत आहे.




## शिक्षक दिनानिमित्त पुरस्कार वितरण

**सुतारवाडी :** डॉ. जी.आर. राजे प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल सुतारवाडी येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षिका कविता भालेराव आणि शीतल सानप यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देण्यात आला. तर सानिका मोरे, (मावशी) आणि वाहन चालक मधुकर चंदने यांना आदर्श सेवा तर सुधाकर निळेकर यांना आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांची होत असलेली प्रगती, उत्कृष्ट शालेय कामकाज, शालेय अभ्यासक्रमाबरोबर विविध उपक्रम राबविले जातात, याबाबत सरपंच सुरेश जाधव, ज्येष्ठ कार्यकर्ते चिंतामण दळवी, पोलीस पाटील संतोष दळवी, सुरेश गायकवाड, दत्तात्रय बेंद्रे, मोहन फडणवीस, अविनाश नाईक, मनोहर साळवी आदींनी शाळेच्या गौरवपर आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षिका कविता भालेराव आणि शितल सानप यांनी आपल्या गुरुंबद्दल आदर व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्कूलचे मुख्याध्यापक हरिचंद्र महाडिक यांनी केले. तर लियाकत कडवेकर यांनी विशेष मार्गदर्शन करून स्कूलसाठी सर्वतोपरी मदत करण्याचे सांगितले.

# श्रीवर्धनमध्ये मोकाट प्राण्यांचा प्रश्न ऐरणीवर

## ।। रात्रीच्या वेळी अपघाताची भीती ।। संगोपन संस्थांकडे पाठवण्याची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यात त्याचप्रमाणे दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोकाट गुरे व घोडे यांचा प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे शेतकरी आपल्या शेतामध्ये भात लागवड करतात ते शेताच्या संपूर्ण सभोवताली काटेरी कुंपण घालतात. त्यामुळे दिवसभर जंगलामध्ये चरल्यानंतर मोकाट घोडे व गुरे आराम करण्यासाठी थेट मुख्य रस्त्यावर येऊन बसतात. आपण रस्त्यावरून जात असतो तेथे कितीही जोराने हॉर्न वाजवला तरीही गुरे उठत नाहीत, त्यांना गाडीमधून उतरून किंवा बाईकवरून उतरून हाकलावे लागते.



रात्रीच्या वेळी देखील मोकाट फिरणाऱ्या गुरांमुळे व घोड्यांमुळे अनेकदा गंभीर अपघात झालेले आहेत. काही जणांनी आपले प्राण गमावले आहेत. तर काहीजण जायबंदी झालेले आहेत. मात्र, या सर्व गोष्टीला जबाबदार कोण? हा प्रश्न वारंवार ऐरणीवर येतो. खेडेगावातील बहुतांश शेतकरी शेती करणे परवडत नसल्यामुळे आपल्या कुटुंबासह कामधंद्यासाठी मुंबईसारख्या शहरांमध्ये जाऊन राहत आहेत. परंतु, या ठिकाणी त्यांची असलेली गुरे मोकाट सोडलेली आहेत. तर श्रीवर्धन व दिवेआगर या समुद्रकिनाऱ्यावरती अनेकजण घोडा सवारी, घोडा गाडी, टांगा अशाप्रकारे धंदे करत असतात. पावसाळ्यात हवामान खराब असल्यामुळे समुद्रकिनारी जाण्यास बंदी असते. अशावेळी हे घोडा गाडीवाले आपले घोडे बिनधास्तपणे मोकाट सोडून देतात.

पर्यायाने याचा त्रास परिसरातील नागरिकांना, रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तसेच शेतकऱ्यांना होत आहे. पूर्वी प्रत्येक गावामध्ये कोंडवाडे होते. परंतु, आता कोंडवाडे उपलब्ध नसल्यामुळे सदरची जनावरे पकडल्यानंतर त्यांना ठेवणार कुठे? हा प्रश्न सर्वांच्या पुढे उभा राहतो. मात्र प्रशासनाने या गोष्टीकडे गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. जी मोकाट गुरे व घोडे यांचे मालक सापडत नसतील तर अशा घोड्यांना व गुरांना पकडून गोशाळेत अथवा घोडे संगोपन करणाऱ्या संस्थांकडे पाठवण्याची गरज आहे. अनेक ठिकाणी गुरे रात्रीच्या वेळी पटकन दिसावी, यासाठी गुरांच्या शिंगांना किंवा त्यांच्या गळ्यामध्ये रेडियमचे पट्टे बांधण्याचे देखील प्रयत्न सुरू आहेत. मात्र, अशा किती जनावरांच्या गळ्यात हे पट्टे बांधणार? हा देखील प्रश्न उपस्थित होतो. श्रीवर्धन नगरपरिषद, पंचायत समिती, तहसील कार्यालय, उपविभागिय अधिकारी उपविभागातील सर्व पोलीस ठाण्यांनी या सर्व गोष्टी वरती संयुक्त बैठक घेऊन योग्य ती दिशा ठरवण्याची आवश्यकता आहे.

प्रत्येक ग्रामपंचायतस्तरावर नागरिकांच्या बैठका घेऊन मोकाट घोडे, गुरे कोणाची आहेत याचा शोध त्या-त्या ठिकाणचे ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटीलांना कशाप्रकारे घेता येईल. यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर उपाययोजना करावी. लवकरच गणेशोत्सव सण येणार असून अनेक चाकरमानी या सणासाठी आपल्या गावाकडे येणार आहेत. ऐन सणासुदीच्या काळात अशा मोकाट घोड्यांमुळे व गुरांमुळे कोणाचा अपघात झाल्यास, नागरिकांवर ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये संकट येऊ शकते. तरी प्रशासनाने लवकरात लवकर यावरती निर्णय घेण्याची मागणी जनतेमधून केली जात आहे.

### शेतीचे नुकसान

अनेक वेळा मोकाट गुरांकडून व घोड्यांकडून भात शेतीचे किंवा अन्य शेतीचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान केले जाते. तर या जनावरांमुळे रस्त्यावर होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांना देखील विनाकारण मनस्ताप सहन करावा लागतो.

## निवडक



### सिलेंडर अट शिथिल करण्याची मागणी

**नेरळ** : आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस सिलेंडर यांची टंचाई निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन सर्व स्तरातील गॅसधारकांना वितरण व्हावे यासाठी काही अटी गॅस वितरकांना घालून दिल्या होत्या. त्याविरुद्ध माजी सरपंच प्रमिला बोराडे यांनी आवाज उठवला होता. मात्र, १८ ऑगस्ट रोजी पत्र देऊन देखील शासनाकडून त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे अनेक महिला ९ सप्टेंबर रोजी आंदोलन करणार आहेत. घरगुती एक गॅस सिलेंडर, घरगुती दोन गॅस सिलेंडर आणि उज्ज्वला योजना असे धोरण निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार दोन गॅस सिलेंडर असलेल्या घरगुती ग्राहकांना भारत गॅस सिलेंडरची अट ४५ दिवसांची ठेवलेली आहे. ती रद्द करण्यात येऊन २५ दिवस करण्यात यावी तसेच गॅस संपल्यास त्वरित उपलब्ध करून देण्यात यावी या मागणीसाठी बोराडे आणि हालिवली गावातील महिलांनी एकत्रित येऊन भारत गॅस एजन्सी कर्जत तसेच तहसीलदार ऑफिस येथे १८ ऑगस्ट रोजी निवेदन दिले होते. परंतु, कर्जत तालुक्याचे मायबाप तहसीलदार कार्यालयाने या निवेदनाची कोणतीही दखल घेतली नाही. तसेच भारत गॅस एजन्सी खारघर येथील ऑफिसमध्ये देखील कळविले नाही. तसेच मीटिंग झाल्यावर निर्णय घेण्यात येईल येवढेच उत्तर देण्यात येत होते.

### प्रवाशांचा जीव धोक्यात

**नागोठणे** : मुंबई-गोवा महामार्गावरील दुरवस्थेची मालिका संपता संपत नसून, आता हा महामार्ग प्रवाशांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. नागोठणे परिसरातील कल्पतरू हॉटेलसमोर एक अत्यंत जीवघेणा आणि महाकाय खड्डा पडला असून, यामुळे वाहनचालकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे प्रशासनाकडून सर्वसामान्यांच्या जीवाशी उघडपणे खेळ सुरू असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या महाकाय खड्ड्यामध्ये मोठ्या प्रमाणात चिखलमिश्रित पाणी साचले आहे. खड्ड्याचा अंदाज न आल्यामुळे अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहने यामध्ये अडकून अपघात होत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि मुसळधार पावसात हा खड्डा वाहनचालकांसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे. महामार्गाच्या दुरुस्तीवर दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च दाखवला जातो, परंतु प्रत्यक्षात परिस्थिती जशीच्या तशीच आहे. हा महाकाय खड्डा पाहिल्यानंतर संबंधित विभाग कोणत्याही मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक आणि वाहनचालक विचारत आहेत. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या हजारो लोकांच्या सुरक्षिततेकडे प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. नागरिकांनी आता प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली असून, या जीवघेण्या खड्ड्याची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



### मूर्ती घडवण्यासाठी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची साथ

**नेरळ** : पर्यावरण राखण्यासाठी शाडूच्या मूर्ती बनवण्यासाठी सरकारचा आग्रह आहे. शाडूच्या मूर्ती बनवण्याचा कारखाना नेरळमध्ये ७५ वर्षे दहिवलीकर कुटुंबाने जपली आहे. ही परंपरा नवीन पिढी चालवण्याची शक्यता धूसर होत चालली असताना अलिबाग, पनवेल, भिवंडी भागातील अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या मुली मदतीसाठी पुढे आल्या आहेत. दरम्यान शाडूची मूर्ती हवी असेल तर आपल्या बाप्पाचा फोटो कॉपी द्या आणि सिद्धेश कला केंद्रातून मूर्ती बनवून घ्या अशी फर्माईश पूर्ण करण्याचे काम दहिवलीकर हे मूर्तिकार करीत आहेत. नेरळ मध्य रेल्वेच्या जंक्शन रेल्वे स्थानकाची आणखी एक ओळख आहे ती म्हणजे शाडूच्या मातीपासून बनविलेल्या गणेश मूर्ती यांची. नेरळ येथील गणेश मूर्ती बनविण्याचे कारखान्याला ७५ वर्षाची परंपरा आहे. महागाई आली तरी भक्तांचे प्रेम कमी झालेले नाही हे नेरळ कुंभारवाड्यामध्ये असलेल्या कारखान्यात होणारी गर्दी बघितली की लक्षात येते. कर्जत परिसरात मोठ्या प्रमाणात अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. त्या ठिकाणी रायगड, ठाणे जिल्ह्याच्या विविध भागातून मुले-मुली शिक्षण घेण्यासाठी येत असतात. यातील नंदिनी कर्वे, प्राजक्ता शिंदे, आर्या पाटील या विद्यार्थिनी आपला फावला वेळ गणेश मूर्तीचे रंगरंगोटी, पॉलिश, नक्षीकाम आदी कामे करण्यासाठी तसेच मातीत हात घालून मूर्ती घडवण्यासाठी आवडीने कामाला लागल्या आहेत.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- महालक्ष्मी किराणा स्टोअर्स जागा भाड्याने देणे आहे. १२०० स्क्वेअर फुट दूकानाचे तीन गाळे भाड्याने देणे आहे. ७०३८६५६४४६
- नागाव येथे रोडटच ६ गुंठे जागा विकणे आहे. तार कंपाऊंड मारले आहे. संपर्क- ७०३८६५६४४६
- ऑफिस कामाकरीता अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर, ऑफिस असिस्टंट रिसेप्शनिस्ट मुलगी पाहिजे. शिक्षण- ग्रॅज्युएशन पूर्ण. Typing, MS-CIT संपर्क- विधान्त इंफ्रा + ९१७२१९२९१२३१ पत्ता- अलिबाग वेळ- ११.०० ते ५.००

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## खालापूरमध्ये रस्त्यांची पाहणी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी खालापूर तालुक्यातील रस्त्यांवरील खड्डे पुढील आठ दिवसांत प्राधान्याने बुजवावेत, असे निर्देश पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

आतरगाव -आडोशी, सारसन-साजगाव, बोरगाव, वडविहीर, सोंडेवाडी, काटवण, चिंचमाळ, पोखरवाडी, आंबेवाडी आदी रस्त्यांची पाहणी करताना रस्त्यांची झालेली दयनीय अवस्था त्यांच्या निदर्शनास आली. गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात नागरिकांची ये-जा होत असल्याने रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघाताची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत पुढील आठ दिवसांत खड्डे बुजविण्याची कामे पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले आहेत.

ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था असल्यास संबंधित ग्रामपंचायतींनी त्या भागातील कंपन्यांच्या व्यवस्थापनाशी समन्वय साधून रस्ते दुरुस्तीसाठी सहकार्य घेण्याचे आवाहनही पारंगे यांनी केले आहे.



नितांत सुंदर पसरलेला हरिहरेश्वर येथील समुद्र किनाऱ्याचे विलोभनीय दृश्य मनाला भूरळ घालताना टिपलेले क्षणचित्र.
(छायाचित्र : अमेय नाझरे, बोर्लीपंचतन)

## गोविंद मेदगे यांचे निधन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड पोलीस दलातील गोविंद मेदगे यांचे सेवा बजावून घरी परतत असताना रस्त्यांमध्ये हृदयविकाराचा झटका आल्याने मृत्यू झाला.



ठाणे जिल्ह्यातील इगतपुरी गाव असलेले मेदगे हे रायगड पोलीसमध्ये भरती झाल्यानंतर कर्जत, नेरळ, माथेरान, रोहा, सुधागड पोलीस ठाण्यात त्यांनी सेवा बजावली आहे. रायगड पोलीसमध्ये सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर काम करणारे मेदगे हे घरी नांदगाव येथे जात असताना हृदयविकाराचा झटका येऊन त्यांचा रात्री मृत्यू झाला.



## ‘कनेक्टिंग लिंकला शिंग्रोबा धनगरांचे नाव द्या’

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील नव्या कनेक्टिंग लिंकला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर यांचे नाव द्या, अशी मागणी करीत जिल्ह्यातील धनगर समाजाने सरकारचे लक्ष वेधले आहे. जिल्हा हर हर चांगभले धनगर समाज संस्था आणि समस्त धनगर समाज बांधवांच्या वतीने खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण यांना निवेदन देण्यात आले. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील कनेक्टिंग लिंकला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर यांचे नाव, देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी ॲड. गणेश आखाडे, संपत ढेबे, नथुराम ढेबे, रामदास कोकरे, संतोष घाटे, काशिलिंग यमगर, ठकूराम झोरे, प्रवीण बावदाने, राकेश कोकळे, प्रकाश उघडे, बाळासाहेब आखाडे, जनार्दन गोरे, पांडुरंग गोरे, निलेश आखाडे, सूरज गोरे, अक्षय आखाडे, जयेश आखाडे आदी उपस्थित होते.

## ऐन पावसाळ्यात लिंबू महाग

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

उन्हाळा संपला की लिंबाचा दर घसरतो. आजवरचा बाजाराचा हा नियम यंदा पावसाळ्यातच अपवाद ठरला आहे. सध्या लहान आकाराचे एक लिंबू १० रुपयाला कर्जत बाजार पेठेत मिळत आहे. उन्हाळ्यात १० रुपयाला दोन लिंबू मिळत असत, लिंबू महाग झाल्याने लिंबू विक्रेत्यांनी लिंबूच्या जागी भाजी विकण्याचा व्यवसाय सुरु केला आहे. सध्या कृषी उत्पन्न बाजार समितीत लिंबाने पावसाळ्यातील आजवरचा उच्चांकी दर गाठला आहे. किरकोळ बाजारात १२० रुपये किलो पर्यंत दर वाढले आहेत. तर बाजार समित्यांमध्ये ठोक बाजारात



• (छायाचित्र : संजय गायकवाड)

हिरवा लिंबू ९५ रुपये किलो, मिक्स लिंबू ९२ रुपये किलो, पिवळा लिंबू ९० रुपये किलो पर्यंत चढा होता. असा उच्चाकी दर मिळाला.मागील दोन वर्षांचा इतिहास पाहता पावसाळ्यात लिंबाचे दर कोसळायचे. २०२४ - २५ मध्ये पावसाळ्यात हिरव्या कच्च्या लिंबाला १० ते १५ रुपये किलो, तर पिवळ्या तयार लिंबाला १८ ते २२ रुपये किलो दर होता. लोणचे उद्योंगाना ८ ते १० रुपयांनी माल विकावा लागत होता. गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२५ मध्येही बाजार समितीत १० ते १२ रुपये किलो दर होता. गेल्यावर्षी अवकाळी आणि सततचा सहा महिने सुरू असलेल्या पावसामुळे लिंबाच्या बागेत फुलगळ मोठ्या प्रमाणात झाली. माल सडला, उत्पादन ५० टक्क्यांपेक्षा जास्त घटले. त्यामुळे यंदा उन्हाळ्यात मार्च-एप्रिलमध्ये लिंबाने १८० ते २०० रुपये किलोचा टप्पा गाठला होता. मे महिन्यात आवक झाली आणि दर ३० ते ४० रुपयांवर आले होते, पण आता पुन्हा कमी पावसामुळे आवक कमी झाली आहे.

## शामकांत पाटील सेवानिवृत्त

**। पेण । प्रतिनिधी ।**

रायगड पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक शामकांत पाटील हे तब्बल ३३ वर्षे ८ महिन्यांची सेवा पूर्ण करून नुकतेच सेवानिवृत्त झाले. पेण तालुक्यातील कणे येथील रहिवासी असलेल्या पाटील यांनी रायगड पोलीस मुख्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, रेवदंडा पोलीस ठाणे, बोर्ली-मांडला पोलीस ठाणे, अलिबाग पोलीस ठाणे, पेण पोलीस ठाणे, मुरुड पोलीस ठाणे, मांडवा सागरी पोलीस ठाणे, जिल्हा वाहतूक शाखा अलिबाग, दादर पोलीस ठाणे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय पेण येथे विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. सेवाकाळात उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना तब्बल १६५ बक्षिसे प्राप्त झाली. महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या हस्ते ‘गुणोत्कृष्ट पदक’ आणि ‘डीजी इन्सिग्निया’ बहाल करण्यात आले असून, राष्ट्रपती पोलीस पदकासाठीही त्यांचे नामांकन झाले होते. त्यांच्या निवृत्तीनिमित्त आयोजित समारंभाला पेणचे उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल तसेच पोलीस सहकारी, मित्रपरिवार व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेल्वे अपघात टाळणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शेलू येथील संतोष जाधव आणि मार्केवाडी येथील केतन धुळे यांचा मध्य रेल्वे महाव्यवस्थापक सेफ्टी अवॉर्डने सन्मान करण्यात आला. मोटरमन असलेले संतोष जाधव यांनी अंबरनाथ स्थानकात तर ट्रॅक मॅनेजर केतन धुळे यांनी बोरघाटात रेल्वे अपघात रोखण्याची भूमिका बजावली होती.




मध्य रेल्वेचे वतीने विविध कामगारांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जीएम सेफ्टी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील सभागृहात अवॉर्ड वितरण करण्यात आले. संतोष जाधव यांनी अंबरनाथ स्थानकात उपनगरीय रेल्वे मार्गावर लोखंडी डब्बा दिसून आल्याने त्याविरुद्ध तत्काळ वरिष्ठ स्तरावर कार्यवाही होण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे मोठा अपघात टळला होता आणि त्यांच्या या कार्याची दखल घेऊन जाधव यांना जीएम सेफ्टी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. तर लोणावळा घाटात १३ ऑगस्ट रोजी ड्यूटीवर असलेले ट्रॅक मॅनेजर केतन धुळे यांना या रेल्वे मार्गावर बोगदा क्रमांक १२ येथे मोठा दगड रेल्वे मार्गिकेवर येऊन पडला असल्याचे दिसून आले होते.त्यावेळी ट्रॅक मॅनेजर असलेले धुळे यांनी डाऊन लाइन वरील सर्व वाहतूक थांबवून ठेवण्याची आणि सुरक्षितता यासाठी मोठे प्रयत्न केले होते. ट्रॅक मॅनेजर यांची सतर्कता आणि तत्पर कार्यवाही आणि प्रसंगावधान यामुळे संबंधित सेक्शन वेळेत सुरक्षित करण्यात आले.त्यावेळी घाट सेक्शनमध्ये होऊ शकणारा मोठा रेल्वे अपघात टळला होता आणि त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन सेफ्टी अवॉर्डसाठी शिफारस करण्यात आली होती.

### सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा सण | मातीचे बैल घरी आणून विधिवत पूजा

## बैलपोळ्यासाठी कुंभारवाड्यात लगबग

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

शेतकरी राजाचा खरा मित्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैलाच्या सन्मानाचा सण म्हणजे बैलपोळा. आयुष्यभर आपल्या धन्याच्या शेतात राबून शेतीला समृद्धी देणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा पारंपरिक सण आहे. परवा साजरा होणाऱ्या बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. एकेकाळी शेतकऱ्यांच्या घरात सर्जा, राज्या, रायबा अशा प्रेमळ नावांनी बैल ओळखले जात होते. नांगरणीपासून शेतीतील विविध कामांपर्यंत बैल हा



शेतकऱ्याचा अविभाज्य साथीदार होता. काळाच्या ओघात आधुनिक यंत्रसामग्रीच्या वापरामुळे अनेक शेतकऱ्यांनी बैलांची विक्री केली असली, तरी बैल पोळ्याबद्दलची श्रद्धा आणि परंपरा आजही कायम आहे. विशेषतः रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात तसेच पनवेल परिसरात बैलपोळा पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. घरात प्रत्यक्ष बैल नसले तरी अनेक कुटुंबे मातीचे बैल घरी आणून त्यांची विधिवत पूजा करतात.

यंदाही बैलपोळ्यानिमित्त पनवेलच्या कुंभारवाड्यात मातीचे आकर्षक बैल तयार करण्याची लगबग सुरू झाली आहे. कुंभारबांधव आपल्या कुशल हातांनी विविध आकारांचे आणि पारंपरिक स्वरूपाचे मातीचे बैल साकारत आहेत. या मातीच्या बैलांना रंगरंगोटी करून त्यांना आकर्षक स्वरूप दिले जात आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांचाच या मातीच्या बैलांकडे विशेष ओढा असल्याचे चित्र दिसत आहे. बैलपोळ्याच्या दिवशी मातीचे बैल घरी आणून त्यांची पूजा केली जाते. त्यांना नैवेद्य दाखवून शेतकरी आणि नागरिक बैलाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करतात. शेती आणि शेतकऱ्याच्या जीवनातील बैलाचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कामही या परंपरेतून होत आहे. बदलत्या काळात प्रत्यक्ष बैलांची संख्या कमी झाली असली, तरी सर्जा-राजाच्या आठवणी मातीच्या बैलांच्या रूपाने आजही जिवंत आहेत.

### संस्कृतीचे सुंदर दर्शन

बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर पनवेलच्या कुंभारवाड्यात सुरू असलेल्या या लगबगीमुळे पारंपरिक संस्कृतीचे सुंदर दर्शन घडत असून, शेतकरी राजाच्या खऱ्या मित्राला मातीच्या रूपातून मानाचा मुजरा केला जात आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-चाफेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद मालकीची मिळकत असून सदर मिळकत आमचे अशिलानी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे-चाफेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री.रमेश पुरूषोत्तम कुर्ले<br>श्री.भगवंत जगनाथ लोढे | ५/३ | २.२८.००<br>यापैकी क्षेत्र ११४ हे.आर. चौ.मी | १.५६ |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक- श्री. रमेश पुरुषोत्तम कुर्ले व श्री.भगवंत जगनाथ लोढे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत सही /-
दिनांक : ०९/०९/२०२६

**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्, मुद्रे (बुद्रुक),
ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, खालील मालकाकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी होवून साठेकरारसुद्धा केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| किहीम, ता.अलिबाग, जि.रायगड. | ४१२/१/ २/१ | ०-५९-७०<br>पो.ख.०-०२-१०<br>०-६१-८० | २.९७ | भगवान नामदेव पाटील |

सदरहू मिळकतीपैकी श्री भगवान नामदेव पाटील यांच्या मालकीची ०-३२-६० हे.आर इतक्या क्षेत्राची मिळकत.

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/ तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०८/०९/२०२६.

**ॲड. सुनिल के.वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या सामाईक मिळकतीचे मालक रमेश सिताराम देवघरे व शरद सिताराम देवघरे यांचेकडून त्यांच्या मालकीचे क्षेत्र विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७७ | ८ | ०-०३-०० | ०-०३ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०९/०९/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू
बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व
फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्री. सुदाम मारुती पवाळी, रा. घर नं. २२, गुरव आळी, मु. पो. कडाव, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विदयमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३५/७ | ०.०३.००<br>पो.ख. ०.१०.०० | ०.०३ |
| | एकुण ०.१३.०० | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत सही /-
दिनांक :- ०९/०९/२०२६.

**ॲड.उषा जे.कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा - रायगड, पोटतुकडी व तालुका रोहा यांचे हद्दीतील मौजे रेवोली ता. रोहा, जिल्हा- रायगड यांचे हद्दीतील शेतजमीन मिळकत आमचे आशिलांनी विकत घेण्यासाठी, मिळकतीचे विद्यमान मालक यांचे बरोबर वाटाघाटी केल्या आहेत. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलास दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

| गट नं | क्षेत्र: हे.आर.पॉ. | आकार: रु.पै | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १९१/अ | ०-४४-८० | १०.०६ | श्री.प्रमोद शांताराम खैरे वैगरे |
| १९१/क | ०-१०-१० | १.७५ | श्री.प्रमोद शांताराम खैरे वैगरे |

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाना, साठेकरार, लीज, लीएन, चार्ज, बोजा, पोटगीहक्क, विक्री, तारण, गहान, जाणेयेणेचा व इतर हक्क असल्यास त्यांनी हक्काचे पृष्ठयार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कराव्यात, वरील मुदती अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलाच्या लाभांत सोडून दिला आहे, असे समजून आमचे सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. ०९/०९/२०२६

**(ॲड. महेंद्र यशवंत धामणे)**
मु.पो सुप्रीम कॉलनी नागोठणे, ता.रोहा, जि.रायगड
मो. नं. ९७६७२५०११०

## जाहीर सावधान नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे कामथ, ता. अलिबाग जि. रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग १७१ एकुण क्षेत्र ०-०३-०० हे. आर. आणि गट क्रमांक व उपविभाग १७२ एकुण क्षेत्र ०-२५-०० हे. आर. पैकी क्षेत्र ०-०७-०० हे.आर. ही मिळकत सद्यस्थितीत श्री अश्विन लेवलीन हार्टमन यांचे नावे सातबारा सदरी दाखल आहे. त्याच प्रमाणे गट क्रमांक व उपविभाग १७२ एकुण क्षेत्र ०-२५-०० हे. आर. पैकी क्षेत्र ०-०७-०० हे. आर हि मिळकत सद्यस्थितीत श्री.जितेंद्र फत्तेसिंग परदेशी यांचे नावे सातबारा सदरी दाखल आहे. सदर मिळकती आमचे अशिल श्री अनिल वल्लभदास अग्रवाल यांनी श्री अश्विन लेवलीन हार्टमन आणि श्री. जितेंद्र फत्तेसिंग परदेशी यांचेकडून खरेदी करण्याबाबत व्यवहार केलेला असून तसा साठेकरार त्यांचेदरम्यान स्वाक्षरीत करण्यात आलेला आहे. सदर मिळकतीची मोबदला रक्कम श्री अश्विन लेवलीन हार्टमन आणि श्री.जितेंद्र फत्तेसिंग परदेशी यांनी आमचे अशिलांकडून स्विकारलेली आहे. सदर साठेकरार रद्द करण्यात आलेला नसून अद्याप पुर्णपणे अस्तीत्वात आहे.

अशी वस्तुस्थिती असताना १) श्री अश्विन लेवलीन हार्टमन आणि श्री. जितेंद्र फत्तेसिंग परदेशी हे वर नमुद मिळकती अन्य त्रयस्थ व्यक्तींस विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीलायक माहीती आमचे अशिलांना प्राप्त झालेली आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. त्यामुळे आमचे अशिलांची प्रस्तावित विक्री व्यवहाराला सक्त हरकत आहे.

तरी वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये. त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. या उपरही आमचे अशिलांची हरकत डावलून बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून जर कोणी वर नमुद केलेल्या मिळकती संदर्भात विक्री अथवा तत्सम प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याबाबत अलहिदा संबंधीतांवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कोर्ट कारवाई करण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०८/०९/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस-लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राममंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मुकेश नारायण गाडे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे चोची तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६५/४/ब | एकुण क्षेत्र ०-२६-०० हे आर पॉ | ४-४४ |
| ६६/४/ब | एकुण क्षेत्र ०-४०-०० हे आर पॉ | ३-७० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०९/०९/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सावरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे सावरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) मोहम्मद नकि अहमद हुसेन सय्यद<br>२) मोहम्मद शाहिद इनायत उल्लाह सिद्दीकी<br>३) सविराली बादअली शाह<br>४) मोहम्मद शरीक अब्दुल हई खान | ५८ | ० | ०-२०-३०<br>पो.ख. ०-०३-००<br>०-२३-३०<br>पैकी ०-०७-७० | २.७५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ०९/०९/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यू को.ऑप.हौ.सोसायटी, शॉप नं.१,
कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी, शॉप नं.१,
कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, खालील शेतजमीन मिळकत आमचे अशिल श्री. सौरभ शिरीष कुलकर्णी, सौ. रमा सौरभ कुलकर्णी, श्री. सारंग संतोष पत्की व सौ.नेहा सारंग पत्की यांनी सदरहु मिळकतीचे मालक श्री. संदीप गोमा पाटील व सौ. रीना संदीप पाटील यांच्याकडून त्यांचे क्षेत्राकरीता खरेदी-विक्रीचे व्यवहारान्वये तसेच दस्तान्वये कायमस्वरूपी मालकी हक्कांने खरेदी तसेच हस्तांतरीत करण्याचे ठरविले आहे. तरी सदर खालील नमुद मिळकतीचे मालकी हक्कांसंबंधी खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - धोत्रे, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड.**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | आकारणी रू. पै | क्षेत्र हे.आर.चौ.मी |
|---|---|---|---|
| ४९/३ | १ | ३.४४ | ४-२७-००<br>+ पो ख ०-६१-००<br>एकुण : ४-८८-०० |

एकुण मिळकतीचे क्षेत्रापैकी श्री. संदीप गोमा पाटील व सौ. रीना संदीप पाटील यांचे मालकीचे, ताबेकब्जातील तसेच वहीवाटेतील तसेच सातबारा सदरी नोंद असलेले एकुण क्षेत्र १-००-०० हे. आर. चौमी क्षेत्रापैकी ०-८०-०० हे. आर. चौमी ''८० गुंठे'' क्षेत्र असलेल्या शेतजमीन मिळकतीचा कायमचा खरेदी-विक्रीचा व्यवहार

तरी प्राप्त परिस्थितीत वर नमुद जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे, त्रयस्तांचे कसल्याही प्रकारचे करार, गहाण, तारण, दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार, एम.ओ.यु, कुलमुखत्यारपत्र, भाडेकरूपणाचा हक्क वा त्यासंबंधीचे कोणतेही न्यायालयीन दावे, मालकी व अन्य हक्क-अधिकार व हितसंबंध असल्यास, त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ''७ दिवसांचे'' आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील कार्यालयीन पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवुन भेटावे.

वरील विहीत केलेल्या नमुद मुदतीमध्ये त्रयस्त वा संबंधीतांकडून तसेच कोणाकडूनही काही लेखी हरकत, नोटीस, तक्रार, दावा न आल्यास सदरहु वर नमुद मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असुन, त्यावर कोणत्याही प्रकारचा हक्क-अधिकार व हितसंबंध तसेच दावा नाही असे समजण्यात येईल व त्या अनुषंगाने आमचे अशिल जमीन मिळकतीचे प्रस्थावित मुळ मालकांकडून जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार नोंदणीकृत दस्तान्वये पुर्ण करतील व विहीत केलेल्या नमुद मुदतीनंतर आलेल्या हरकती हया ग्राह्य धरल्या जाणार नाहीत तसेच आलेल्या हरकती, नोटीसा, तक्रारी, दावे या रद्दबादल आहेत व त्या जाणीवपुर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

तारीख : ०८/०९/२०२६
ठिकाण : पनवेल

**ॲड. प्रशांत परशुराम वाघमारे.**
बी.एल.एस.,एल एल बी.
पत्ता :- ऑफिस नं.११३, पहिला मजला,
पनवेल महानगरपालिका शॉपींग कॉम्प्लेक्स,
आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके
नाट्यगृहाजवळ, पनवेल, ता.पनवेल,
रायगड -४१०२०६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे कामथ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कामथ ता.अलिबाग | १७२ | जिरायत ०-०१-७०<br>वरकस ०-१९-३०<br>पो.ख.०-०४-००<br>०-२५-०० | ०.६१ |

वर नमुद मिळकतीपैकी विक्रेता यांचे मालकीचे ०-११-०० हे.आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक पुजा हरेश वरपे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०८/०९/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस-लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राममंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान जमीनमालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीन मिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/ हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमत: पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| आवास, ता.अलिबाग, जि.रायगड. | ४२६/० | ०-७९-००<br>पैकी<br>०-२०-०० | ३.२३ |

अलिबाग,
दिनांक : ०९/०९/२०२६.

**राजेंद्र दा.पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड,
मो. ९८२२५२८९३१,
ई मेल -adv.rdpatil@gmail.com.

महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुरुड-जंजिरा यांचेकार्यालय**

**दरबार रोड ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड पिन - ४०२ ४०१**

दुरध्वनी क्रमांक ०२१४४/२७४०२६, ई मेल- tahasilmurud@gmail.com

क्र./टेनन्सी शाखा/कात-२/३२ग/दावा क्र.०५/२०२६ दिनांक :-०८/०९/२०२६

## जाहीर नोटीस

१. श्रीम. सुमित्रा दत्तात्रेय पाटील — वादी
रा. मु. येसदे पो. वळके
ता. मुरुड जंजिरा जि. रायगड.

विरुद्ध

१. श्री. विनय रामचंद्र मथुरे
२. श्री. जनार्दन पुरुषोत्तम मथुरे
३. श्री. सचिदानंद पुरुषोत्तम मथुरे
४. श्री. मधुकर पुरुषोत्तम मथुरे
५. श्री. दत्तकुमार पुरुषोत्तम मथुरे — प्रतिवादी
६. श्री. चंद्रशेखर पुरुषोत्तम मथुरे
७. श्री. श्रीकृष्ण पुरुषोत्तम मथुरे
८. श्री. जगदीश रामचंद्र मथुरे
९. श्री. मिलिंद रामचंद्र मथुरे
१०. श्री. पद्मज नितीन दिघे
११. श्री. दत्तात्रेय शंकर मथुरे

क्र.१ ते ११ सर्व रा.मु.पो.सबनीस आळी,
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड.

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, मौजे आमली ग.नं./स.नं. १०३ ता.मुरुड, जि.रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक १५/०७/२०२६ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. सामनेवाले तर्फे श्री. विनय रामचंद्र मथुरे हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले आहेत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक ०८ /१०/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय मुरुड, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण तथा तहसिलदार मुरुड-जंजिरा यांचे न्यायालयात समक्ष हजर राहून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./स.न | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|---|
| आमली | ८२ | ०.०५.०० | ०.०३ |

सदरची जाहीर नोटीस माझ्या सही शिक्यांनिशी दिली.

सही/-
**(आदेश डफळ)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**तथा तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## मुरुड जंजिरा नगरपरिषद

लोकमान्य टिळक रस्ता ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड
पिन कोड ४०२४०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४४-२७४०२२,
ई मेल आयडी co.murudjanjira@gmail.com

जावक क्रमांक :५६२ दिनांक ०७/०९/२०२६

विषय :- पथविक्रेता (उपजिवीका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता यांचे सदस्यांच्या निवडणूक कार्यक्रम सन २०२६बाबत.

महोदया,

पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील नियम १४(२) अंतर्गत मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीमधील नोंदणीकृत पथविक्रेत्यांमधून ०८ जणांची नगर पथविक्रेता समितीमध्ये निवड करावयाची आहे. दि. १९/०८/२०१६ रोजी मुरुड जंजिरा नगरपरिषद पथविक्रेता समिती निवडणूक करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. निवडणूक कार्यक्रमानुसार मुरुड जंजिरा पथविक्रेता समितीची उमेदवारी अर्ज सादर करण्याची दिनांक ३१/०८/२०२६ अंतिम तारीख होती. तथापी निवडणूक कार्यक्रमात नमुद केल्यानुसार उमेदवारी अर्जासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे (कर/पाणीपट्टी/ना हकरत दाखला जातीचे प्रमाणपत्र जात वैधता प्रमाणपत्र/लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र) उमेदवारांकडे उपलब्ध नसल्याने एकही उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्राप्त झाला नाही. सबब, निवडणूक कार्यक्रमानुसार पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत पथविक्रेता समितीची निवडणूक प्रक्रीया रद्द करण्यात आली आहे असे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केले.

सही/-
**(राखी गावडे)**
सहायक निबंधक अधिकारी, सहकारी संस्था.
मुरूड, जि.रायगड तथा
निवडणूक निर्णय अधिकारी
महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन)
(महाराष्ट्र) नियम २०१६ अन्वये मुरुड जंजिरा नगरपरिषद

महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुरुड-जंजिरा यांचे कार्यालय**

**दरबार रोड ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड पिन - ४०२ ४०१**

दुरध्वनी क्रमांक ०२१४४/२७४०२६, ई मेल- tahasilmurud@gmail.com

क्र./टेनन्सी शाखा/कात-२/३२ग/दावा क्र.०४/२०२६ दिनांक :-०८/०९/२०२६

## जाहीर नोटीस

३२/दावा क्र.:-टेनन्सी शाखा/कात-२/०४/२०२६

१. श्री. सचिन दत्तात्रेय पाटील — वादी
रा.मु.येसदे पो.वळके ता.मुरुड जंजिरा जि.रायगड.

विरुद्ध

१. श्री. विनय रामचंद्र मथुरे
२. श्री. जनार्दन पुरुषोत्तम मथुरे
३. श्री. सचिदानंद पुरुषोत्तम मथुरे
४. श्री. मधुकर पुरुषोत्तम मथुरे
५. श्री. दत्तकुमार पुरुषोत्तम मथुरे — प्रतिवादी
६. श्री. चंद्रशेखर पुरुषोत्तम मथुरे
७. श्री.श्रीकृष्ण पुरुषोत्तम मथुरे
८. श्री.जगदीश रामचंद्र मथुरे
९. श्री.मिलिंद रामचंद्र मथुरे
१०. श्री.पद्मज नितीन दिघे
११. श्री.दत्तात्रेय शंकर मधुरे

क्र.१ ते ११ सर्व रा.मु.पो.सबनीस आळी,
ता.मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, मौजे आमली ग.नं./स.नं.१०३ ता.मुरुड, जि.रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक १५/०७/२०२६ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. सामनेवाले तर्फे श्री. विनय रामचंद्र मथुरे हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले आहेत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक ०८/१०/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय मुरुड, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण तथा तहसिलदार मुरुड-जंजिरा यांचे न्यायालयात समक्ष हजर राहून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./स.नं | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|---|
| आमली | १०३ | ०.१६.१० | ०.१८ |

सदरची जाहीर नोटीस माझ्या सही शिक्यांनिशी दिली.

सही/-
**(आदेश डफळ)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**तथा तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी देत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## जागतिक डेडलिफ्ट चॅम्पियनशिपमध्ये राऊल फ्लोरेसनने रचला इतिहास

**बर्मिंगहॅम :** बर्मिंगहॅममधील युटिलिटा एरिना इथं झालेल्या जागतिक डेडलिफ्ट चॅम्पियनशिपमध्ये, २५ वर्षीय राऊल फ्लोरेसनं इतिहास रचला. मेक्सिकोच्या राऊल फ्लोरेसनं डेडलिफ्टमध्ये ५११ किलोग्रॅम वजन उचलून जागतिक विक्रम प्रस्थापित केला. फ्लोरेसनं ५१० किलोग्रॅम वजन उचलणाऱ्या हाफ्थॉर ब्योर्नसनचा जागतिक विक्रम मोडला. यामुळं फ्लोरेस जगातील सर्वात शक्तिशाली पुरुषांपैकी एक बनला आहे. ब्योर्नसननं २०२५ च्या जागतिक डेडलिफ्ट चॅम्पियनशिपमध्ये ५१० किलोग्रॅमचा हा डेडलिफ्ट विक्रम प्रस्थापित केला होता.राऊल फ्लोरेस गेल्या काही काळापासून डेडलिफ्ट स्पर्धेच्या क्रमवारीत वेगानं प्रगती करत आहे. जेव्हा फ्लोरेसनं जागतिक डेडलिफ्ट चॅम्पियनशिपच्या सरावादरम्यान ५०४ किलोग्रॅम वजन उचललं, तेव्हा तो मुख्य स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करेल अशी अपेक्षा होती आणि त्यानं तसं करुन दाखवलं. मुख्य इव्हेंटमध्ये, हाफथॉर ब्योर्नसनचा ५१० किलोचा विक्रम मोडला जाईल अशी कोणालाच अपेक्षा नव्हती, पण फ्लोरेसनं यशस्वीपणे बारबेल उचलताच संपूर्ण हॉल टाळ्यांच्या कडकडाटानं दुमदुमला.५०० किलो वजन उचलणारा फ्लोरेस ठरला फ्लोरेस हा स्ट्राँगमॅनच्या इतिहासात अर्ध्या टनापेक्षा जास्त, म्हणजेच ५०० किलो वजन उचलणारा केवळ तिसरा खेळाडू ठरला. फ्लोरेसच्या आधी, २०१६ मध्ये एडी हॉलनं सर्वप्रथम ५०० किलो वजन उचललं होतं. त्यानंतर एडी हॉलचा विक्रम हाफथॉर ब्योर्नसननं मोडला, ज्यानं ५०१ किलो वजन उचललं. काही वर्षांनंतर हाफथॉरनं स्वतःचाच विक्रम सुधारण्याचा निर्णय घेतला. हे साध्य करण्यासाठी, त्यानं निवृत्तीतून परतण्याचा निर्णय घेतला. परतल्यानंतर, हाफथॉरनं ५१० किलो वजन उचलण्याचं ध्येय ठेवलं आणि तो त्यात पूर्णपणे यशस्वी झाला. हाफथॉरनं स्वतःचाच जागतिक विक्रम मोडून एक नवीन विक्रम प्रस्थापित केला, पण अवघ्या एका वर्षातच, त्याचा विक्रम मोडला.

## २८ वर्षांनंतर दुर्मीळ योगायोग जुळून येणार

**नवी दिल्ली :** पुढच्या महिन्यातील ३ ऑक्टोबर हा दिवस भारतीय क्रिकेटच्या दृष्टीने ऐतिहासिक दिवस ठरण्याची शक्यता आहे. या दिवशी भारताचे दोन पुरुष संघ एकाच वेळी दोन वेगवेगळ्या देशात खेळण्यासाठी क्रिकेटच्या मैदानात उतरताना दिसण्याची शक्यता आहे. एकीकडे भारताचा एक संघ मुल्लांपूर येथे वेस्ट इंडिज विरोधात तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा



सामना खेळण्यासाठी उतरणार आहे. तर दुसरीकडे भारताचा दुसरा संघ जपानमध्ये क्रिकेटचा सामना खेळताना दिसू शकतो. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना हा ३ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजल्यापासून खेळवला जाणार आहे. याच दिवशी जपानमधील निशिन येथील कोरोगी स्पोर्ट्स पार्कमध्ये आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेतील कांस्य आणि सुवर्ण पदकासाठीचे सामने खेळवले जाणार आहेत. भारतीय पुरुष क्रिकेट संघ याआधीही एकाच दिवशी दोनवेगळ्या ठिकाणी क्रिकेट सामने खेळला होता. १२ सप्टेंबर १९९८ रोजी असं घडलं होतं. त्या दिवशी क्वालालंपूर येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेदरम्यान, सचिन तेंडुलकर, अनिल कुंबळे यांचा समावेश असलेला भारतीय संघ कॅनडाविरुद्ध मैदानात उतरला होता.

# इशान किशनची शानदार खेळी!





**। चेन्नई । वृत्तसंस्था।**

भारतीय यष्टिरक्षक फलंदाज इशान किशननं पुन्हा एकदा शानदार कामगिरी केली आहे. दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात पूर्व विभागाकडून खेळताना, त्यानं दक्षिण विभागाविरुद्ध द्विशतक झळकावून आपल्या दमदार कामगिरीचं प्रदर्शन केलं. यामुळं पूर्व विभागानं अंतिम सामन्यातील आपलं स्थान अधिक मजबूत केलं आहे. दुलीप ट्रॉफीमधील हे इशानचं पहिलं द्विशतक आहे. यापूर्वीही त्यानं द्विशतके झळकावली आहेत. या स्पर्धेत पूर्व विभागासाठी द्विशतक झळकावणारा तो तिसरा फलंदाज ठरला आहे.

दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात सध्या पूर्व विभाग आणि दक्षिण विभागाचे संघ एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. प्रथम फलंदाजी करताना, पूर्व विभागानं आपली धावसंख्या ६२५ च्या पुढं नेली आहे. यामध्ये इशान किशनच्या शानदार द्विशतकाचा समावेश आहे. त्यानं प्रथम आपलं शतक पूर्ण केलं आणि त्यानंतर लगेचच १५० धावांचा टप्पा ओलांडला. यानंतर त्यानं द्विशतकही पूर्ण केलं. शेवटी तो २५० धावांवर रिटायर्ड हर्ट झाला. प्रथम श्रेणी क्रिकेटमधील हे त्याचं पहिलं द्विशतक आहे. यापूर्वी त्यानं वनडे आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्येही द्विशतक झळकावलं आहे.

**३९ वर्षे जुना विक्रम इतिहासजमा**

**२५० धावांसह केल्या सर्वाधिक धावा**

इशाननं अवघ्या २७० चेंडूंमध्ये आपलं द्विशतक पूर्ण केलं. त्यानं एकूण २५० धावांची खेळी केली. यादरम्यान त्यानं ७ षटकार आणि २७ चौकार मारले. विशेष म्हणजे, त्यानं आपलं द्विशतक एका चौकारानं पूर्ण केलं. यापूर्वी अरुण लाल आणि सबा करीब यांनी दुलीप ट्रॉफीमध्ये ईस्ट झोनसाठी दोनदा द्विशतकं झळकावली आहेत. यामुळं हा पराक्रम करणारा तो तिसरा फलंदाज ठरला आहे.

यापूर्वी अंशुमन गायकवाड यांनीच हा पराक्रम केला होता. १९८७ मध्ये गायकवाड यांनी कर्णधार म्हणून दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात २१६ धावांची खेळी केली होती. आता, इशान दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात सर्वाधिक धावा करणारा कर्णधार ठरला आहे. याचा अर्थ त्यानं जवळपास ३९ वर्षांचा विक्रम मोडण्यात यश मिळवलं आहे. दुलीप ट्रॉफीच्या इतिहासात केवळ दोनदाच फलंदाजानं ३०० धावांची खेळी केली आहे. रमण लांबानं ३२० धावा आणि गगन खोडानं दुलीप ट्रॉफीमध्ये पूर्ण ३०० धावा केल्या आहेत. या दोघांव्यतिरिक्त आजपर्यंत इतर कोणत्याही फलंदाजानं ३०० धावा केलेल्या नाहीत.

# पाकिस्तान क्रिकेटमध्ये भूकंप



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सध्या इंग्लंड अन् पाकिस्तान यांच्यात तीन सामन्यांची टेस्ट सिरिज सुरू आहे. यामध्ये दोन टेस्ट पूर्ण झाल्या आहेत. इंग्लंडने ही सिरिज २-० ने जिंकली आहे. तर पाकिस्तान संघाचा दोन्ही सामन्यात दारुण पराभव झाला आहे. दोन्ही सामने गमावल्यानंतर पाकिस्तान संघात उलथापालथ सुरू झाली आहे. ९ ते १३ तारखेदरम्यान शेवटचा आणि तिसरा सामना खेळवला जाणार आहे. मात्र त्याआधी पाकिस्तान संघात मोठे भूकंप होत असल्याचे दिसून येत आहे.

इंग्लंडविरुद्धच्या सलग दोन कसोटी सामन्यांतील लाजीरवाण्या पराभवानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डात मोठा स्फोट झाला आहे. तीन सामन्यांच्या सिरिजमध्ये अजून शेवटची कसोटी बाकी असतानाच पाकिस्तानने सिरिज गमावली आहे. या नामुष्कीनंतर पीसीबीने अत्यंत कठोर पाऊल उचलत अचानक तब्बल सात खेळाडूंना मायदेशी परत पाठवले असून कोचिंग स्टाफचीही हकालपट्टी केली आहे.

सिरिज गमावल्यानंतर आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने इंग्लड दौऱ्यावर गेलेल्या खेळाडूंच्या वर्तनाची आणि शिस्तभंगाची उच्चस्तरीय चौकशी सुरू केली आहे. मीडिया रिपोर्ट्समध्ये आलेल्या गंभीर

- **९ ते १३ सप्टेंबर दरम्यान खेळवली जाणार तिसरी कसोटी**
- **पाकिस्तानकडे शेवट गोड करण्याची असणार संधी**

आरोपांनंतर ही कारवाई करण्यात आल्याचे बोर्डाचे म्हणणे आहे. बोर्डाकडून अधिकृतपणे खेळाडूंच्या शिस्तभंगाचे कारण दिले जात असले, तरी पडद्यामागे हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे मानले जात आहे. खेळाडूंचे गैरवर्तन, आपापसातील मतभेद आणि इतर काही संशयास्पद हालचालींबाबत पीसीबीचे अधिकारी सध्या उघडपणे बोलणे टाळत असल्याचे समजते आहे.

सिरिजमधील तिसरा आणि अंतिमसामना अद्यापबाकी असतानाच अर्ध्याहून अधिक खेळाडूंना आणि मुख्य प्रशिक्षकांसह सपोर्ट स्टाफला हटवण्यात आल्यामुळे पाकिस्तान संघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ऐन मालिकेच्या मध्यमात झालेल्या या मोठ्या कारवाईमुळे पाकिस्तान क्रिकेटमधील अंतर्गत कलह आणि अनागोंदी पुन्हा एकदा जगासमोर आली आहे.

लॉर्ड्स कसोटीदरम्यान इमाम-उल-हक दुखापतग्रस्त झाल्यामुळे मैदानातून बाहेर पडला होता. मात्र, तो खरोखरच दुखापतग्रस्त आहे की संघातून काढता पाय घेण्यासाठी त्याने दुखापतीचे बनावट नाटक रचले, असा गंभीर आरोप आता त्याच्यावर होत आहे. क्रीडा वर्तुळात आणि पाकिस्तानच्या माजी खेळाडूंकडून इमामच्या या वर्तनावर प्रचंड टीका होत आहे.

आरोप सिद्ध झाल्यास इमाम-उल-हकवर आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यास बंदी घातली जाण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे विकेटकिपर अन् फलंदाज मोहम्मद रिझवान याला अचानक मायदेशी बोलावल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.



# खेळाडूच्या निवडीने वादाला फोडणी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दक्षिण अफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २४ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर दरम्यान तीन सामन्यांची वनडे मालिका होत आहे. तीन वर्षानंतर ऑस्ट्रेलियन संघ वनडे मालिकेसाठी दक्षिण अफ्रिकेत जाणार आहे. ऑस्ट्रेलिया पुन्हा एकदा मालिका विजयासाठी मैदानात उतरणार आहे. असं असताना क्रिकेटविश्वात संघाची घोषणा होण्यापूर्वी कमालीची उत्सुकता आहे.

संघात कोण असेल? कोण नसेल? याबाबत चर्चा रंगते. संघात काही अनपेक्षित बदल दिसले की त्यावरून वाद होणं सहाजिकच आहे. दक्षिण अफ्रिकन संघाबाबत असं आता असं घडलं आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी संघाची घोषणा केली आहे. यात युवा फलंदाज डेवाल्ड ब्रेव्हिस याला संघात स्थान मिळालं नाही. त्यामुळे क्रीडाप्रेमींनी निवड समितीवर आगपाखड केली आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धची वनडे मालिका दक्षिण अफ्रिकेसाठी खूपच महत्त्वाची आहे. कारण वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेच्या दृष्टीने ही तयारी असणार आहे. असं असताना या मालिकेत २३ वर्षीय आक्रमक फलंदाज डेवाल्ड ब्रेव्हिसला डावलल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. त्याच्या ऐवजी संघात डावखुरा फलंदाज टोनी डिजोर्जी याची निवड केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. दक्षिण अफ्रिकन क्रिकेटप्रेमींनी ही बाब काही रूचलेली नाही. काही चाहत्यांनी उघडपणे आपली नाराजी व्यक्त केली आहे. इतकंच काय तर त्या पोस्टखाली लिहिलं की, अशा परिस्थितीत पुढच्या वर्षी होणारा वर्ल्डकप काही जिंकत नाही.

# श्रेयसच्या जागी तिलकला संधी?



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघ २७ सप्टेंबरपासून वेस्ट इंडिजविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळणार आहे. चौथ्या क्रमांकावर नियमितपणे फलंदाजी करणारा श्रेयस अय्यर या मालिकेत उपलब्ध असण्याची शक्यता कमी आहे.

परिणामी, युवा फलंदाज तिलक वर्माला संधी मिळू शकते, त्याला चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची महत्त्वाची जबाबदारीही सोपवली जाऊ शकते.

या भूमिकेसाठी तिलक वर्मा हा एक प्रबळ दावेदार मानला जात आहे. तो डावखुरा फलंदाज असून मधल्या फळीत खेळतो. जर रोहित शर्माची वेस्ट इंडिज मालिकेसाठी निवड झाली, तर भारताची वरची फळी बऱ्यापैकी निश्चित दिसते. रोहित शर्मा आणि शुबमन गिल डावाची सुरुवात करू शकतात, तर विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करू शकतो. हे तिघेही उजव्या हाताचे फलंदाज आहेत. अशा परिस्थितीत, चौथ्या क्रमांकावर डावखुरा फलंदाज तिलक वर्माला खेळवल्यास डावखुरा-उजव्या हाताचा फलंदाजीचा संयोग साधता येईल. परिस्थितीनुसार आपल्या फलंदाजीचा वेग बदलण्याची क्षमता ही तिलकची जमेची बाजू आहे. डावाला स्थैर्य देण्याची आणि गरज पडल्यास वेगाने धावा करण्याची क्षमता त्याच्याकडे आहे. त्यामुळे, एकदिवसीय सामन्यांमध्ये चौथ्या क्रमांकावर त्याची चाचपणी करणे हा संघ व्यवस्थापनासाठी एक महत्त्वपूर्ण पर्याय ठरू शकतो.

श्रेयस अय्यरच्या जागेसाठी केवळ तिलक वर्माच दावेदार नाही, तर ऋतुराज गायकवाडही शर्यतीत आहे. त्यामुळे त्याच्या दाव्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

वेस्ट इंडिज मालिकेसाठी कोणाला संधी द्यायची, याचा निर्णय घेताना निवडकर्त्यांना खेळाडूचा अनुभव आणि सध्याचा फॉर्म यांचा समतोल साधावा लागेल.

## फुटबॉलरवर विष दिल्याचा आरोप

**। जर्मन । वृत्तसंस्था ।**

जर्मनीचा फुटबॉलपटू मारियसला त्याचा सहकारी खेळाडू फिलिपला विष देऊन मारल्याच्या संशयावरून अटक करण्यात आली आहे. पोलिसांना संशय आहे की, त्याने जून २०२५ मध्ये संघाच्या ड्रेसडेन दौऱ्यात ३० वर्षीय फिलिपला गुपचूप विष दिले होते. फिलिपची तब्येत ड्रेसडेनहून परतल्यानंतर वेगाने बिघडली होती. कुटुंबाने आपत्कालीन सेवांना फोन केला. त्यानंतर त्याला रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, परंतु १६ जून २०२५ रोजी त्याचा मृत्यू झाला. दोन्ही खेळाडूंमध्ये एका महिलेवरून वाद झाला होता अशी चर्चा आहे.

# पीटरसनचं इंग्लंड क्रिकेटमध्ये अनपेक्षित पुनरागमन!



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

१२ वर्षांपूर्वी ज्यांच्यामुळे केविन पीटरसनची कमालीची आंतरराष्ट्रीय कारकीर्द अचानक संपुष्टात आली, त्याच खेळाडूसोबत आता पीटरसन पुन्हा काम करणार आहे. इंग्लंड क्रिकेटमध्ये केविन पीटरसनची तब्बल १२ वर्षांनंतर पुन्हा एन्ट्री झाली आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने केविन पीटरसनच्या खांद्यावर मोठी जबाबदारी दिली आहे.

केविन पीटरसनच्या खांद्यावर इंग्लंडच्या वनडे आणि टी-२० संघाचा स्पेशल मेंटॉर म्हणून जोडण्याचा निर्णय घेतला आहे. २०२७च्या वनडे वर्ल्ड कपच्या तयारीसाठी पीटरसनची ही भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. विशेष म्हणजे, १२ वर्षांपूर्वी ज्या खेळाडूमुळे पीटरसनचं शानदार आंतरराष्ट्रीय करिअर लवकर संपलं होतं, आता त्याच व्यक्तीसोबत पीटरसन काम करणार आहे. त्यामुळे त्याची ही पुनरागमनाची बातमी आणखी चर्चेत आली आहे.

पीटरसनने २०१४ मध्ये इंग्लंडकडून अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. आता तो ब्रेंडन मॅक्क्युलमच्या कोचिंग स्टाफमध्ये सहभागी होणार असून, पुढील १२ महिने संघासोबत काम करेल. दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या २०२७ वनडे वर्ल्ड कपच्या तयारीसाठी पीटरसन संघाला मार्गदर्शन करणार आहेत.

२०२७ चा वनडे वर्ल्ड कप दक्षिण आफ्रिकेत होणार आहे. पीटरसनने दक्षिण आफ्रिकेत मोठ्या प्रमाणात क्रिकेट खेळलं असून, तिथल्या खेळपट्ट्या आणि वातावरणाची त्याला चांगलीच माहिती आहे. त्यामुळे आगामी वर्ल्ड कपमध्ये पीटरसनचा अनुभव इंग्लंडच्या संघासाठी महत्त्वाचा ठरू शकतो.

या नव्या भूमिकेबाबत पीटरसन म्हणाला, दक्षिण आफ्रिकेत वर्ल्ड कप जिंकण्याच्या प्रवासात संघाला मदत करण्याची संधी मिळणं माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. २०१४ नंतर पहिल्यांदाच पुन्हा इंग्लंडची जर्सी परिधान करणं हा माझ्यासाठी सन्मानाचा आणि भावूक करणारा क्षण आहे. आमच्याकडे अतिशय उत्कृष्ट व्हाइट-बॉल संघ आहे. या खेळाडूंसह मेहनत करून त्यांची क्षमता अधिकाधिक वाढवण्यासाठी मी उत्सुक आहे. पुढील १२ महिने ब्रेंडनच्या थिंक टँकचा भाग होणं ही माझ्यासाठी शानदार संधी आहे. मी कामाला सुरुवात करण्यासाठी आतुर आहे.

**नवोदित खेळाडूंची जोरदार मुसंडी** | **मुलांच्या गटात धक्कादायक निकालांची नोंद**

# पुण्यात मानांकन टेनिस स्पर्धेचा थरार

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटनेच्या (पीएमडीटीए) वतीने, तसेच केपीआयटी आणि सोलींको यांच्या प्रायोजकत्वाखाली आयोजित १४ वर्षांखालील मुले व मुलींच्या पीएमडीटीए मानांकन रोहित शिंदे टेनिस अकादमी ब्रॉन्झ सिरिज २०२६ टेनिस स्पर्धेत विहान सावंत, ऋषभ बेहेरे आणि अन्वय फाटक यांनी मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का देत पुढील फेरीत प्रवेश केला.

कर्वे रोड येथील रोहित शिंदे टेनिस अकादमीच्या (आरएसटीए) टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या गटातील



दुसऱ्या फेरीत अव्वल मानांकित यायरा सॅमसनने कीयारा निमिशेचा टायब्रेकमध्ये ६-५ (१) असा पराभव करत आगेकूच केली. नवव्या मानांकित हृदवी लिमकरनेही दमदार खेळ करत परिणीता कदमवर ६-० असा एकतर्फी विजय मिळवला.

मुलांच्या गटात मात्र काही धक्कादायक निकालांची नोंद झाली. विहान सावंतने १३व्या मानांकित अथर्व बारस्करचा ६-४ असा पराभव करत अनपेक्षित विजय नोंदवला. विहानने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत सामन्यावर नियंत्रण ठेवले आणि मानांकित प्रतिस्पर्ध्याला नमवत पुढील फेरीतील आपले स्थान निश्चित केले.ऋषभ बेहेरेनेही १४व्या मानांकित कृष्णा अभयचा ६-० असा एकतर्फी पराभव करत स्पर्धेत सनसनाटी निकाल नोंदवला. ऋषभने सामन्यात प्रभावी सर्व्हिस आणि आक्रमक फटक्यांचा सुरेख मिलाफ साधत प्रतिस्पर्ध्याला एकही गेम जिंकण्याची संधी दिली नाही.

याशिवाय बिगरमानांकित अन्वय फाटकने १०व्या मानांकित रिवांश बहिरटवर ६-३ असा विजय मिळवत आपली आगेकूच कायम राखली. अन्वयने संयमी तसेच आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत मानांकित प्रतिस्पर्ध्यावर मात केली आणि स्पर्धेतील आपली दावेदारी मजबूत केली.मानांकित खेळाडूंवरील या विजयांमुळे विहान सावंत, ऋषभ बेहेरे आणि अन्वय फाटक यांनी १४ वर्षांखालील मुलांच्या गटात विशेष लक्ष वेधून घेतले असून, पुढील फेरीतील त्यांच्या कामगिरीकडे टेनिसप्रेमींचे लक्ष लागले आहे.

## राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धा

# मयुरेश, स्वरा करमरकर ठरले अजिंक्य

**उपांत्य फेरीतही खेळाडूंची दमदार कामगिरी**





**। पुणे । प्रतिनिधी ।**

वर्धा जिल्हा हौशी टेबल टेनिस संघटनेच्या वतीने आयोजित चौथ्या महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत ठाण्याच्या मयुरेश सावंतने मुलांच्या १७ वर्षांखालील गटात, तर नाशिकच्या स्वरा करमरकरने मुलींच्या १७ वर्षांखालील गटात विजेतेपद पटकावले. दोन्ही खेळाडूंनी अंतिम सामन्यात आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत स्पर्धेतील सर्वोच्च स्थान मिळवले.

वर्धा येथील डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेतील १७ वर्षांखालील मुलांच्या गटाच्या अंतिम सामन्यात मयुरेश सावंतने ठाण्याच्याच प्रतीक तुळसानीचा सरळ तीन गेममध्ये पराभव केला.

सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत मयुरेशने सामन्यावर वर्चस्व राखले आणि सहज विजय मिळवत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

१७ वर्षांखालील मुलींच्या गटात नाशिकच्या स्वरा करमरकरने अंतिम सामन्यात ठाण्याच्या त्रिशा लुडबेवर विजय मिळवत विजेतेपद पटकावले. सुरुवातीचे दोन्ही गेम जिंकल्यानंतर त्रिशाने तिसरा व चौथा गेम जिंकत सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र निर्णायक पाचव्या गेममध्ये स्वराने दमदार खेळ करत ११-० असा एकतर्फी विजय मिळवला आणि विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.स्वरा करमरकर ही जय मोडक टेबल टेनिस अकादमीमध्ये प्रशिक्षक जय मोडक आणि पुनित देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)